# अदृश्य वेदना



अक्षय पोवार

# अदृश्य वेदना

**(कथासंग्रह)**

# अक्षय पोवार

ई साहित्य प्रतिष्ठान

# अदृश्य वेदना (कथासंग्रह)

**लेखक: अक्षय पोवार**

२८-४४२, पंचारती सोसायटी, चारकोप सेक्टर ०४,
कांदिवली पश्चिम, मुंबई उपनगर, ४०००६७

फोन : +91 9136843413

ई-मेल : powarakshay01@gmail.com
वेबसाइट :
https://akshaykhajina.blogspot.com/
फेसबुक :
https://www.facebook.com/akshaykhajina

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत
400604
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : ८ फेब्रुवारी २०२६

©esahity Pratishthan®2026

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# प्रस्तावना

नमस्कार..



माझं नाव अक्षय आहे. सध्या मी साहित्यक्षेत्रात लेखक म्हणून कार्यरत आहे.

माझं प्राथमिक शिक्षण मुंबईत “आदर्श विद्यालय”, गोरेगाव येथे झालं आहे. माध्यमिक शिक्षण “पाराशर हायस्कूल पारगांव”, कोल्हापूर येथे झालं आहे. “इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल ॲण्ड रूरल इंजिनिअरिंग”, गारगोटी या संस्थेतून मी मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा पूर्ण केला आहे. त्याचबरोबर “यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ” येथून राज्यशास्त्र हा विषय घेऊन मी माझं पदवीच शिक्षण पूर्ण केलं आहे.

वाचता वाचता निर्माण झालेली लेखनाची आवड मला साहित्यक्षेत्राकडे घेऊन आली. सध्या मी "ॲमेझॉनवर" तसेच "अक्षय खजिना" या फेसबुक पेजवर नवनवीन कथा-कादंबऱ्या प्रकाशित करत आहे. आत्तापर्यंत माझ्या चार कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत.

त्यातील पहिली कादंबरी “सखी” ही एक रोमँटिक थ्रिलर प्रकारातील आहे. तर दुसरी कादंबरी “आरशातलं प्रेम” ही एका अव्यक्त प्रेमाची रहस्यकथा आहे. तिसरी कादंबरी “अधुरी कहाणी” ही आजच्या तरुणाईच्या लग्न

मानसिकतेवर आधारीत आहे. काळाच्या पलीकडे जाऊन कर्मचक्र समजाऊन सांगणारी “अदृश्य बाप” ही कादंबरी  टाईम ट्रॅव्हल संकल्पनेवर आधारित आहे.

“अदृश्य वेदना” हा कथासंग्रह “ई-साहित्य प्रतिष्ठान” या संस्थेमार्फत प्रकाशित होत आहे याचा आनंद आहे. ई-साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना यातील कथा आवडतील अशी आशा आहे.

पुस्तकांच्या अक्षय खजिन्यात आपलाही एखादा मोती चमकावा म्हणून सुरू असलेला हा एक प्रयत्न!

धन्यवाद.

आपलाच लेखक,

**अक्षय पोवार,**

कांदिवली पश्चिम, मुंबई

# अर्पणपत्रिका

# लाड पुरवणाऱ्या प्रिय "पोपट मामा" चरणी समर्पित

# अदृश्य वेदना

(प्रस्तुत कथा काल्पनिक असून कोणत्याही वास्तव घटनेशी किंवा जिवंत अथवा मृत व्यक्तीशी संबंध नाही)

**" आपलं दुःख आपल्या माणसांना न कळणं हेच एक मोठं दुःख आहे. अन् जर का ते कळत असूनही आपली विचारपूस न करणं यासारखी वेदना असह्य आहे. या वेदना घेऊन जिणं अशक्य आहे. अशाच काही "अदृश्य वेदना" या कथासंग्रहात एकवटल्या आहेत."**

# अनुक्रम


| | |
|---|---|
| राजा राणी | ११ |
| प्रेमरंग | २६ |
| मरणाची घाई | ३९ |
| चतकोर भाकरी | ४८ |
| अदृश्य वेदना | ६२ |


राजा राणी
अक्षय पोवार

# राजा राणी

विषय अभ्यासा व्यतिरिक्त होता. पण या विषयाचा अभ्यास करणं फार महत्वाचं होत. कारण विषय प्रेमाचा होता. अन् आमचा भावनेचा अभ्यास अजिबातच नव्हता.

राणीन पुन्हा “बा ऽ ला जाऊन सांगीन” म्हणून धमकावलं होतं. पुन्हा अपयश आलं होतं. सुर्ज्यान सांगितलं ते सर्व केलं होत.

“लाईन देतीस का.. मैत्रीण हुतीस का.. माझं तुझ्याव लय प्रेम हाय” या सारखे आऊटडेटेड, सिनेमांत गावातल्या मुलांच्या तोंडी दाखवतात तसे डायलॉग अजिबात वापरले नव्हते. (गावठी म्हटलेल आम्हांला खपत नाय)

सिद्ध्या म्हणतो तसं, एकदम प्रोफेशनल वागण्याचा प्रयत्न करत होतो. तरी पुन्हा राणीन नकारच दिला. मी काय बोलणार आहे हे ऐकण्याआधीच तिचा नकार!

मी जवळ गेलो अन् तिन नकार दिला. मनात म्हटलं “अग बाई ऐकून तर घे माझं” आधीच काय, “बा ऽ ला सांगीन, भावाला आणीन, जवळ आलास तर बघ..”

मी कोणी गावगुंड होतो की कोणी दरोडेखोर होतो.. तुझ्याच वयाचा होतो ना.. तुझ्याच शाळेत शिकत होतो.. आठवीत शिकणारा एक गरीब सामान्य मुलगा. (आगाऊ)

तुझ्या इतका सुंदर नसेन किंबहुना हुशारही नसेन पण निदान ऐकून तर घ्यायचं होतंस. काय लायकी राहिली माझी. माझेच मित्र माझ्यावर हसायला लागले.

सुर्ज्या म्हटला, “ल्येका तुझ्या डोळ्यातच दिसतय. तुझ डोळं बघूनच न्हाई म्हटली ती.”

“त्यात तुझी ही चौथी खेप..” सिद्ध्यानं सुर्ज्याला टाळी देत आठवण केली.

“काय दिसतंय माझ्या डोळ्यात..?” मी रडवेल्या नजरेने विचारलं. (खर तर नाटकी)

“हवस..” मागून परव्यानं मीठ चोळलं. तसे तिघेही हसू लागले.

मी पुन्हा तोंड पाडून बसलो. “हसा कडव्यांनो, उद्या तिला घेऊन फिरीन ना तवा मागणं धूर निघल तुमच्या.”

“तुझ्या मागची आग ईजीव मग आमचा धूर काढ.” परव्या पुन्हा जोर जोरात हसू लागला.

“तुझ्या तर आता..” मी त्याला धरण्याचा प्रयत्न करू लागलो. तिघेही माझी मजा घेऊ लागले.

“बास ए ऽ बास.. आवरा बेल हुईल आता.. राजा बास कर तुझं रडगाणं.. तासाचं काय ते बघा लेकांनो..” सूर्ज्यान आम्हांला अडवत पुन्हा मूळ मुद्यावर आणलं.

हे आमचं नेहेमीच होत. मधली सुट्टी झाली की डब्याची पिशवी घ्यायची अन् सरळ झाडाखाली जेवायला जायचं. जेवण झालं की प्रमेय सोडवत बसायचं. ही सुट्टी मोठी होती. अर्ध्या तासाची. त्यामुळे निवांत वेळ मिळायचा.

पण सकाळी राणीनं दिलेला नकार अजून पचला नव्हता. त्यामुळेच मी उदास होतो. वरवर हसत खेळत वाटत असलो तरी मनावर खोल जखम झाली होती.

कारण ही पहिली वेळ नव्हती. चौथ्यांदा राणीनं मला दूर सारलं होतं. तसा हा नकारही नव्हताच. मी राणीला माझ्या मनातलं सांगूच शकलो नव्हतो. मी जवळ येताच ती “नाय, बा ऽ कावील” करत माझ्यापासून लांब पळत होती.

मला तिला प्रपोजच करायचं होत पण ती माझं म्हणनच ऐकून घेत नव्हती. एका बाजूला मला तिच्या अशा स्वभावाबद्दल बरंही वाटत होत अन् दुसऱ्या बाजूला निराशाही वाटत होती.

तिचा चेहरा डोळ्यासमोर आणून मी पुन्हा स्वयंप्रेरीत होत होतो. मी हार माननार नव्हतो. कारण मी राजा होतो अन् राजा हारत नसतो तो लढत असतो. जिंकण्यासाठी. (लयच मोठं बोललो)

पुन्हा लढण्यासाठी मी स्वतःला तयार केलं. अन् राणी पुराण काही वेळ बाजूला ठेवलं. सिद्ध्याकडं लक्ष देऊ लागलो. कारण की पुढचा तास भुमितीचा होता. अन् प्रमेय सोडवता आला नाही की पाटील मास्तर गरुड पुराणातल्या शिक्षा द्यायचा.

तसा दिवसातला हा सातवा तास होता. (इंग्रजी भाषेत पिरेड) मधल्या सुट्टी नंतरचा तास. अन् नेमकं याच तासाला भरपूर झोप यायची. (गावरान भाषेत मायंदाळ).

अन् आजच ह्यो पाटील मास्तर प्रमेय फळ्यावर लिहून घेणार होता. कळला तर अजिबात नव्हता. कुठलाच. त्यानं शिकवलेला. (पुढं बसणाऱ्या चार पाच होतकरू हुशार विद्यार्थ्यांना सोडून)

त्याचीच रिविजन सिद्ध्या घेत होता. सिद्ध्या तसा गणितात हुशार. सूर्ज्या ही हुशार. मी अन् परव्या जरा कमी हुशार. (म्हणजे ढ)

खरं, टूटे दिल की बेचैनी में (जरा जरा फिल्मी भाषेत सांगायचं तर) अभ्यासात काही लक्ष लागत नव्हत.

सिद्ध्यानं पुन्हा नव्याने सांगायला सुरुवात केली अन् तिकडं बेल वाजली. आम्हीं काय होणार ते ओळखून माना हलवल्या अन् वर्गात जायला निघालो. वर्गात जाऊन कुठली शिक्षा मास्तर देईल किंवा आज कुठल्या भाषेत आमचा उद्धार करील याचा अंदाज लावत बसलो.

देवानंच धाऊन यावं तसा कोणी तरी माणूस पाटील मास्तर बरोबरच वर्गात आला.

“बर ऐकारे, हे साहेब आपल्या केडीसी बँकेतले आहेत. काय म्हणतायत लक्ष देऊन ऐका जरा.”

साहेब बोलू लागले.

“कसंय मुलांनो, तुम्ही आता आठवीला आहात. म्हणजे तुम्हाला व्यवहाराची चांगली माहिती आहे. पण बँकेचा व्यवहार कसा चालतो याची माहिती असनंही गरजेचं आहे.”

“आई बाबा पैसे देतात ते आपण खाऊन टाकतो.. कधी कधी साठवतो.. पण कुठे साठवतो, तर आपल्या गल्ल्यात. हीच सवय आपल्याला बदलायची आहे. तुम्हीं जे गल्ल्यात पैसे साठवता तेच तुम्ही बँकेत साठवायचे.”

“याने काय होईल तुम्हाला बँकेतला व्यवहारही कळेल अन् तुमची रक्कमही वाढू लागेल. आणि बर का, तुम्हीं ती रक्कम काढू ही शकता.”

“अगदी पाच रुपयांपासून कितीही रक्कम तुम्ही जमा करू शकता अन् काढू शकता.”

सगळ्यांनी खोट्या टाळ्या वाजवल्या. (लक्षात आलंच असेल)

साहेब पुढे बोलू लागले.

“बँकेने खास तुमच्यासाठी ही सोय सुरू केली आहे. शाळकरी मुलांना लवकर बँकेचा व्यवहार कळावा म्हणून. अन् याची सुरवात आपल्या पाराशर हायस्कूल पासूनच आम्ही करणार आहोत. आजपासूनच.. अगदी आतापासून.. तुम्हीं चार चार जणांच्या ग्रुपने या अन् आपलं खात उघडा..”

टाळ्यांचा कडकडाट झाला. (ह्या टाळ्या खऱ्या होत्या हे सांगावं न लगे.)

“आणि एक” पाटील मास्तर बोलू लागले, “काय पाच पन्नास पैसे असतील तर जमा करूनच या.. वेळ झाला तरी चालेल खरं बँकेचा व्यवहार आदी शिकून घ्या. काय लागलं तर सायब हायत तिथं.”

“हो सर ऽ ऽ..” पूर्ण वर्गाचा आवाज. (आदराने अन् आनंदाने)

पाटील मास्तर तोंडातल्या तोंडात हसून पाहू लागले अन् न राहवून म्हणाले,

“बेट्यांनो, आज बँकेचा व्यवहार शिकून घ्या. उद्या तुमचा मी प्रमेयाचा व्यवहार तपासतो.” तसा वर्गात एकच हशा पिकला. पाटील मास्तरही आमच्या हास्यात मिसळून गेले.

पाऊण तासाने आमच्या चौघांचा नंबर आला. सपकाळ तसा आधी मी जाणार म्हणून परव्याशी नडत होता. खरं फोटो नसल्याचं लक्षात येताच तो तोंड पाडून बसला होता. (वेडा होता तो)

तसा फोटो आमच्याकडे ही नव्हता पण आम्हीं त्याच्यासारखे वेडे नव्हतो. आम्हांला बाहेर जाण्याचं कारणच हवं होतं. अन् हे तर आपसूक आमच्याजवळ चालून आलं होतं. (आम्हीं सपकाळ सारखा वेडेपना करतोय होय)

हसत खेळत बँकेत गेलो. केडीसी बँक अगदी शाळेजवळच होती. रस्त्याच्या ह्या बाजूला आमची शाळा अन् विरुद्ध बाजूला दोनशे मीटरच्या अंतरावर केडीसी बँक.

आरामात बँकेत जाऊन बसलो. जरा इकडं तिकडं केलं. सायबांनी बोलवल्यावर गेलो. त्यांनी "फोटो तेवढा आणून उद्या पासबुकावर लावा अन् स्टॅम्प घ्या" म्हणत आम्हा चौघांना परत पाठवलं.

आम्हीं पुन्हा हसत खेळत बाहेर पडलो. रस्त्याने चालू लागलो. तशी रहदारी कमी होती. रस्त्यालगत शाळा असूनही वाहने वेगात होतीत. (आरटीओचा बोर्ड फक्त नावाला असतो. बघत कोण नसतं.)

एक आज्जी रस्ता क्रॉस करताना दिसली. ती रांगत रांगत रस्ता क्रॉस करत होती. तिच्या वाढलेल्या वयानं हातापायाची कार्यक्षमता संपली म्हणून केव्हाच सांगितलं होतं. म्हणूनच तिचा रांगत रांगत संघर्ष सुरू होता.

ती बरोबर रस्त्याच्या मधोमध जाऊन थांबली. तिच्याच्याने काही हालचाल होईना. एकदा उजवीकडे एकदा डावीकडे ती सुन्न होऊन पाहत राहिली.

आम्हीं चौघांनीही तिला पाहिल. तिची परिस्थिती आमच्या लक्षात आली. रस्त्याच्या दोन्ही बाजूने वाहने येत होतीत. पुढून भरधाव वेगात ट्रक येत होता तर पाठीमागून एसटी धुरळा उडवत येत होती.

आम्ही क्षणाचाही विलंब न करता तिच्याजवळ गेलो. चौघांनीही तिला उचलून धरलं आणि रस्ता क्रॉस केला. दोन्ही वाहने सुसाट गेलीत. (रस्ता त्यांच्याच बापाचा होता)

न राहून आमच्या चौघांच्याही तोंडातून कोल्हापुरातली रांगडी शिवी बाहेर पडली. (कुठली ती सांगावे न लगे)

“खुळया बोड्याच हाय का रं” परव्या.

“तर मर्दा, म्हातारीला उडवली असती पार” सिद्ध्या.

“आज्जे कशाला रस्त्याच्या मधनं जातीस. विमानं उडत्यात इथं. गप बसवत नाय व्हय एका जाग्याला.” सुर्ज्या.

“म्हातारे आता गेली असतीस ढगात” मी खाली वाकत तिच्या जवळ बसत म्हणालो.

“ए बाळा.. ए बाळा.. बरं झालं आलासां..” ती माझ्या हाताला धरत माझ्या हाताचं मुकं घेत बोलू लागली.

“बाळांनू, बाळांनू..” तिला काय बोलावं सुचत नव्हतं. तिच्या तोंडून शब्द बाहेर पडत नव्हते. पण तिच्या भावना सरळ काळजात घुसत होत्या.

तिचा एक एक मुका हृदयाला स्पर्श करत होता. माझ्या तर डोळयातच पाणी आलं. (खरंच)

“राजा रं पायाला लागलय वाटतं” सिद्ध्या खाली बसत म्हणाला.

त्यानं तसं म्हणताच तिन माझ्याकडे हसऱ्या नजरेन पाहिलं. दोन्ही हात माझ्या चेहऱ्याभोवती फिरवून माझी माया करु लागली.

तिन माझ्या डोक्यावर हात ठेवला. मनभरून बघितल. तिच्या डोळ्यात पाणी होत की तिचे डोळेच तसे होते माहीत नाही.

“आज्जे काय कराय चाललेलीस..? कुठं राहत्यास..? कुठं लागलंय बघू..?”

“नाय नाय कुठं लागाय नाय” तीनं तिचं गाठोड माझ्याजवळ दिलं अन् बोलू लागली.

“यात काय हाय..?”

“ए सोन्या एवढं दे जा रं माझ्या राजाला.. तिकडं मारुती जवळ बसलाय..”

“कोण हाय..?”

“आं ऽ”

“कोण हाय..?” मी पुन्हा म्हणालो. (यावेळी जोरात)

“राजा हाय माझा एवढं एक काम कर लेका.”

“तू जा की.” (होय मीच म्हणालो. ते तिघही असेच पाहू लागले)

“आं ऽ..?”

“तु का जाईत नायस..?” (पुन्हा जोरात)

“राजा मर्दा हळू.” (तिघही एकत्र)

“थांबा जरा..”

“व्हय आज्जें तु का जाईत नायस ..?”

“मी व्हय..”

“व्हय..”

तशी ती नाराज झाली. “दम लागलाया. पायानं जमंना.” तीनं पायाला हात लावला.

“नाय जमत तर कशाला रस्त्याच्या मधी जायचं आज्जे. काय झालं असत म्हंजी..?”

तशी ती एकदम गप्प झाली. गाठोडं स्वतः जवळ घेऊ लागली. हलक्या अंगाने मागे सरली. अन् जायला निघाली.

“एकडं आण ती. रुसलीस व्हय..?” मी तिच्यासमोर जात बोलू लागलो.

“नाय बाळा.. राजा उपाशी असंल.. मला जाया पायजे..” तिचे डोळे पाण्याने भरले होते. (ते रडून रडून पाणीदार झाले होते. मला ते कळून चुकलं.)

“एकड आण ती.. कुठ जायचं नायस.. पाय बघ ती कसं झाल्यात. आधी त्याला मलम पट्टी लाव.. सूरज्या उचला आधी दवाखान्यात न्हिवू या.”

तिघांनीही तिला उचलत सरकारी दवाखान्यात नेलं. (जवळच होता. पटायला अवघड जाईल पण सरकारी दवाखान्या समोरच हे सगळं झालं होत.)

आजूबाजूचे बघतच होते. (अर्थात कौतुकाने)

पळत पळतच मारूती मंदिराजवळ गेलो. (जास्त लांब नव्हत मंदिर)

राजा एका कोपऱ्यात येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडे हसत बसला होता. तोंड वेड वाकडं करत होता. मधूनच रस्त्याच्या कडेला पाहत होता. (कुणाकडे हे सांगाव न लगे)

त्याला क्षणात ओळखून मी त्याच्या बाजूला बसलो.

“काय मग राजा भूक लागलीय का..?”

तो नुसताच हसू लागला. हात वेडे वाकडे करुन हो म्हणू लागला.

“ही धर बाबा तुझ्यासाठी आणलंय.”

“राणी.. राणी..” गाठोड ओळखून तो हसला. माझ्या मागे पाहू लागला.

“राणी होय.” मी हसलो. (का ते सांगावं न लगे)

“येत्या येत्या..”

तो इकडं तिकडं पाहू लागला. हालचाल करु लागला.

“बस बस.. काय नाय झालं.. येत्या..”

“राणी.. राणी..” त्याला काही राहवेना. त्याच्या मनाची चलबिचल झाली. मी त्याला सांगण्याचा प्रयत्न करु लागलो. तो काही मला आवरेना. गाठोड त्यानं बाजूला ठेवलं. अन् त्याची नजर राणीला शोधू लागली

मी तसाच बसून राहिलो. त्यांची वाट बघू लागलो. काही वेळाने ते सर्व आले..

त्यांना येताना बघून राजानं राणीला ओळखलं. त्याची चलबिचल आणखी वाढली.

तिघांनीही राजाच्या शेजारी आज्जीला व्यवस्थित बसवलं. पायाला मलम लावला होता. जखम मोठी नव्हती. (देवाचं उपकार)

दोघंही एकमेकांच्या गळयात पडले. राजा काळजीने “राणी राणी” करत होता. आज्जी त्याला भावनेच्या भाषेत सांगत होती.

“आज्जे”, मी तिच्या शेजारी बसत बोलू लागलो. “कुठं राहताय तुम्ही..?”

“आम्ही व्हय,” ती डोळयात पाणी ठेऊन बोलू लागली. “जागा घावल तिथ ऱ्हातो बाबा.”

“घर न्हाय तुमास्नी..?”

“हिचं घर म्हणायचं.”

“हीच होय.. पोरं काय करत्यात..?”

तशी ती शांत झाली. तिच्या पाणीदार डोळयांनी उत्तर दिलं. “चार वरीस झालं, पोरगं परदेशात गेलं ती गेलं” (माझ्या मनानी तिच्या पोरांना मन भरून शिव्या दिल्या)

“तुमचं घर हाय कुठं खरं..?”

“राजा, राजावाणी वागला काय कमी पडू दिलं नाय पुरग्याला.. पार घरादारा सकट इकुन टाकलं”

“मग आता काय.. कुठं ऱ्हाणार..?”

“राजा हाय न्हव.”

“राजा संगच म्हणालोय कुठं ऱ्हाणार..?”

"बंगल्यात.." तशी ती मन भरून हसली.. आम्ही भरलेल्या डोळयांनीच दोघांकडे पाहू लागलो..

"राजाला काय झालं. का पोरांमुळ..?"

"नशीबाम्होरं काय चालणार.. हुईल ती हुईल.." तशी ती शांतच झाली. तिचं गाठोडं उघडून त्यातली भाकर त्याला चारू लागली.

आम्हीं चौघही डोळयात पाणी ठेऊन त्यांना पाहत होतो.

"अवघड हाय लका.." सिद्ध्या.

"अशी कशी वागू शकत्यात रं..?" सुर्ज्या

"आता काय म्हाईत..? आपण काय बोलणार." मला तर काहीच सुचत नव्हत. काही वेळ आम्हीं शांतच राहिलो.

"ती न्हव," सिध्यांन बोलायला सुरवात केली. "राजा राणी व्हय.." माझ्या खांद्याला खांदा मारत मला डीवचलं. तसे तिघंही हसू लागले.

आम्हीं चौघही डोळयात पाणी ठेऊन त्यांना पाहत होतो.

"राजा राणी व्हय.." सिद्ध्यानं माझ्या खांद्याला खांदा मारत मला डीवचलं. तसे तिघंही हसू लागले.

"राजा काय वाटतय..?" सुर्ज्या..

"काय वाटणार.. मर्दा, अशी जीव लावणारी राणी पायजे. नको त्या महालातली. नको ती लावण्यवती.. नको ती सुंदरा.." (माहित आहे टोन बदललाय.. पण भावना महत्वाच्या)

“राजं राजवाड्यातन झोपड्यात या..” परव्या. पुन्हा तिघे हसले. (दुसरं येतं काय यांना)

मी नाक मुरडत बोलू लागलो. “एवढच बोलायचंय की बघा, असं पायजे प्रेम. अशी पायजे साथ. आताच्या पिढीला नाय जमणार ही. (यात मी सुद्धा आहे)

“मर्दा माझी राणी कशी असंल माहीत नाय खरं तिन अशी साथ दिली तर तिचा राजा व्हायला मी तयार हाय.”

“बघू या की..” तिघही एकत्र जोर जोरात माना हलवत बोलले. (खरंच मित्रांचा विश्वास बसनं लय अवघड)

शाळा सुटली. घंटा वाजली होती. आमची पंचाईत झाली होती. इतका वेळ या गोष्टीत गेला ते आमच्या ध्यानीमनी आलं नाही.

“आता रं..?”. परव्याचा मूर्ख प्रश्न.

“आता काय, मोरे मास्तर हाणतोय उद्याच्याला धरून. आधीच शाळेतनं पोरं पळून जात्यात म्हणून बोंबाबोंब हाय. आयतं घावलो त्यांच्या तावडीत आता.” सुर्ज्या.

चौघही नाराज झालो. खरं राजा राणीच प्रेम बघून आमचं दुःख विसरून गेलो.

या जगात देव आहे हे त्या दिवशी कळालं. एका सुद्धा मास्तरन आम्हाला हाणलं नव्हत. ज्या मोरे मास्तरची भीती होती. त्यानंच आम्हाला आज्जीला उचलून नेताना पाहिलं होतं.

आजपर्यंतचा इतिहास आहे स्टेजवर फक्त मार खायलाच गेलो होतो. पण त्या दिवशी आयुष्यात पहिल्यांदा स्टेजवर सत्कार झाला होता. अभ्यासाच्या विषयात पहिला आलो नव्हतो. पण ज्यासाठी सत्कार केला त्या कामाचा अभिमान वाटत होता.

शाळेच्या बाहेरही बरंच काही शिकायला मिळतं हे तेव्हाच आमच्या लक्षात आलं होत. (खर तर बाहेरची दुनियाच खरी शाळा शिकवते - अनुभवावरून)

रस्त्यावरच्या राजा राणीचा धडा आम्हाला बरंच काही शिकवून गेला होता.

पुढे ते कधी दिसतील तेव्हा आम्हीं काही ना काही त्यांना खायला देत होतो. आमच्याकडून होईल ती मदत करत होतो.

कधी तरी त्यांच्यासोबत बसत होतो. एकदा राणीनं आम्हांला त्यांच्यासोबत पाहिलं होत. परव्यानच तिला बघताना पाहिलं होत. तशी ती लाजली होती. (माझा आपला भाबडा समज)

परव्या म्हटला, “आईशप्पथ तुलाच बघत होती.” मी लाजलो.. (का ते सांगावे न लगे)

पुढे बोलू लागला, “खरं हसून बघत होती का बघून हसत होती ते म्हाईत नाय.” तसे तिघही हसू लागले. (मित्र.. शेवटी कसे असतात तुम्हाला माहीत आहे)

त्यानंतर पाचव्यांदा मी पुन्हा प्रयत्न केला होता. (काय झालं असेल ते सांगावे न लगे)

••••


प्रेमरंग
अक्षय पोवार

# प्रेमरंग

बऱ्याच दिवसांनी जुनी ट्रंक उघडली अन् एक फोटो नजरेस पडला.. मी, वैभ्या, अन् माझी ऐश्वर्या..

तो किस्सा घडल्या घडल्या आम्ही स्टुडिओत गेलो अन् ही आठवण कैद केली.

असं म्हणतात प्रेम केलं जात नाही ते होऊन जातं. मग ते कोणाशीही होईल, कधीही होईल. त्याला ना रंग, ना रुप, ना धर्म, ना जात. ते फक्त होऊन जातं.

आता ते सत्यात उतरवायचं की सोडून द्यायचं हे ज्याचं त्याने ठरवायचं.

आता पर्यंतचा इतिहास तरी प्रेमासाठी काहीही करण्यापर्यंतचा आहे.

अगदी सवयी बदलण्यापासून ते युद्ध करण्यापर्यंत. प्रेम सर्व काही बदलवून टाकत. माझ्याही बाबतीत असंच झालं.

दहावीला आलो आणि आमच्या वर्गात एक नवीन मुलगी आली.

मला खूप आवडायची ती. एकटक मी तिच्याकडे बघत असायचो.

गोरी गोरी पान. काळेभोर केस. पाणीदार डोळे. ती जेव्हा हसायची तेव्हा तिच्या दोन्ही गालावर खळी पडायची.

तिची एक बट सारखी तिच्या खळीला डीवचायची. ती मग हलक्या हाताने ती बट कानामागे सारायची. पण ती बट काही एका जागी स्थिर राहत नसायची. माझ्या मनासारखी.

ती बट सतत तिच्या गालाला गुदगुल्या करायची. ती पुन्हा बट कानामागे सारायची. तिला तसं पाहत राहणं माझ्यासाठी स्वर्गात राहण्यासारख होतं.

पुस्तक नजरेसमोर ठेऊन मी तिलाच पाहत असायचो. कधी तरी मॅडमांना डाऊट यायचा अन मला एखादा प्रश्न विचारण्यासाठी उभं करायच्या.

पण मी फार नशीबवान. वैभव सारखा मित्र होता मला. मॅडमनी उभ केलं की तो हळू आवाजात मला उत्तर सांगायचा. चुकीचं. मुद्दाम.

सगळा वर्ग मग हसायचा. एकदा मोरे मॅडमनी असाच एक प्रश्न विचारला. मोरे मॅडम विज्ञान शिकवायच्या.

एकदा असच मी स्वर्गात गेलो होतो. माझी अप्सरा माझ्या समोर बसून गोड हसत होती. मी तिच्यात गुंतून गेलो होतो.

मॅडमच लक्ष माझ्याकडे गेलं आणि त्यांनी मला उभ राहायला सांगितलं. माझ्याकडे जरा रागात बघत त्यांनी मला प्रश्न विचारला.

“सांग कोणता रंग..?”

मला काहीच कळायला मार्ग नव्हता. माझ्या समोर प्रेमाचा रंग पसरला होता. तो प्रेमरंग उधळण्यात मी तल्लीन झालो होतो. मॅडम कोणता रंग विचारत होत्या ते मला नेमक कळत नव्हतं.

मी वैभ्याकडे पाहिलं. तो जरा गंभीर नजरेने माझ्याकडे पाहत होता. मी त्याला नजरेनेच विचारत होतो. तो माझ्या पँटच्या दिशेने मला खुणावत होता.

मला काही कळत नव्हत. त्याचा इशारा मला कळत नव्हता. त्याने हळूच आवाजात मला सांगितलं..

“काळ्या रंगाची बोल.”

“काय ..?”

“तू बोल फक्त… काळ्या रंगाची..”

मॅडमनी पुन्हा आवाज दिला. “काय कुठला रंग.. आठवतोय का नाही..?” मी गडबडलो. या वेळी त्यांचा आवाज मोठा होता.

मी पटकन म्हणालो “काळ्या रंगाची.”

सगळा वर्ग हसायला लागला.

“काय..?” मॅडमनी पुन्हा आश्चर्याने विचारल.

“काळ्या रंगाची पँट घातली आहे मॅडम.”

पूर्ण वर्ग हसू लागला. मॅडम माझ्याकडे रागाने पाहू लागल्या. त्यांना काय बोलावं ते सुचेना. मला काय करावं ते सुचेना.

वैभव डोकं खाली ठेवून हसत होता. मला कळालं, याने नक्की काही तरी मस्ती केली आहे.

“गेट आउट.. बाहेर जाऊन उभा रहा..” मॅडमनी रागात मला वर्गा बाहेर काढल. मी बाहेर जाईपर्यंत सगळा वर्ग हसत होता.

मला हेच कळत नव्हतं. मॅडमचां नेमका प्रश्न काय होता. आणि मी काय उत्तर दिलं होतं.

वर्गाबाहेर काढलं याचं दुःख नव्हत. दिवसाआड आम्हांला अशा शिक्षा मिळतच होत्या. त्याची आता सवयच झाली होती. थोड्या वेळाने वैभव पण येईल अशी माझी खात्री होती.

तसच झालं. मॅडमनी पुन्हा प्रश्न विचारला. यावेळी मी लक्ष देऊन ऐकू लागलो.

"ए तू सांग रे.. लिटमसचा रंग कोणता असेल..?"

मॅडमचा प्रश्न आत्ता माझ्या लक्षात आला.

मी दिलेलं उत्तर आठवून माझं मलाच हसू आलं.

पुढच्या क्षणात वैभव पण माझ्या बाजूला येऊन उभा राहिला. आम्ही दोघेही एकमेकांकडे बघून हसू लागलो.

काही वेळाने मधली सुट्टी झाली. मॅडम आम्हाला न बघताच निघून गेल्या. आम्ही निर्लज्जा सारखे पुन्हा वर्गात जाऊन बसलो.

पूर्ण वर्ग आमच्याकडे बघून हसत होता. आम्ही गालातल्या गालात हसत जागेवर जाऊन बसलो.

मला काही क्षण तोंड वर करून बघू वाटेना. माझी इज्जत गेली होती. बॅड इंप्रेशन पडलं होतं. ती माझ्या बद्दल काय विचार करत असेल याच विचारात मी होतो.

मी हळूच तिच्याकडे पाहिलं. ती माझ्याकडेच पाहत होती. हसऱ्या नजरेने मला न्याहाळत होती.

मला काही कळेना. मी लगेच नजर चुकवली. तिला हसताना पाहून माझ्या मनात लाडू फुटत होते.

मी काही वेळ तिच्याकडे पाहिलच नाही. काही वेळाने मी तिच्याकडे पुन्हा पाहिलं तर ती एकटक फक्त माझ्याकडेच बघून गालात हसत होती.

मी पुन्हा नजर चुकवली. ती नेमकी अशी का बघत आहे. या बद्दल माझ्या मनात अनेक प्रश्न उभे राहीले. खूप विचार येऊ लागले.

तो दिवस त्या विचारातच गेला. मी वैभवला याबद्दल सांगितलं. त्याने या गोष्टी मस्करीतच घेतल्या.

तो इतकच म्हणाला, “भावा असा विचार पण करु नको.. पुन्हा कधी असा विचार मनात आला ना तर एकदा स्वतःचा हात डोळ्यासमोर घेऊन बघ.”

मला त्याच्या अशा बोलण्याचा राग यायचा. पण तो काही क्षणापूर्ताच. पुढच्याच क्षणी काही तरी इलॉजिकल बोलून तो पुन्हा मला हसवायचा.

मला कळत होतं. मी तिच्या इतका सुंदर अजिबात नव्हतो. तिचा मित्र बनण्याइतपतही मी लायक नव्हतो.

माझ्या पेक्षा कितीतरी सुंदर मुलांना ती फाट्यावर मारत होती. शाळेतला एक अन् एक मुलगा तिच्या मागे होता. पण ती कोणालाच भाव देत नव्हती.

माझी अन् वैभ्याची मस्ती चालायची तर ती आम्हांला पाहत असायची. आमच्या प्रत्येक विनोदावर मन भरून हसायची.

ती आमच्या शेजारच्या बाकावर बसू लागली. मी खूप खुश झालो. सतत या ना त्या कारणाने तिच्याशी बोलण होऊ लागलं.

हळूहळू आमची मैत्री वाढली. ती माझ्याशी मन भरून बोलू लागली. आमच्या विनोदावर हसू लागली. हसता हसता तिने दिलेल्या टाळीचा स्पर्श मला सुखावु लागला.

तिचं असं माझ्याशी बोलण अनेकांना टोचू लागलं. वैभ्या एकदा म्हणाला, “तू किती पण प्रयत्न कर पण ती तुला पटणार नाही.”

तो असं का म्हणत होता ते मला कळत होत. तो माझ्या रंगावरून मला जज करत होता.

त्यांच म्हणणं क्लिअर होत. “तिच्या सारखी सुंदर गोरी पान मुलगी माझ्या सारख्या काळ्या मुलाच्या प्रेमात कधीच पडणार नाही.”

“मुलींना सुंदर, उंच, मस्क्युलर मुल आवडतात. त्यात तू अजिबात बसत नाही.”

“ती तुझ्याशी बोलते, तुझ्यासोबत हसते ते फक्त तिला बर वाटतं म्हणून तिचा टाईमपास होतो म्हणून.”

“तू या गोष्टी मनावर नको घेऊ. पोरी फक्त चेहरा बघून प्रेम करतात. पैसा बघून लग्न करतात. नंतर तुला लय त्रास होईल..”

त्यांचं असं बोलण माझ्या मनाला लागायचं. एका बाजूने पाहिलं तर तो खर तेच बोलत होता.

मला कोणी तरी पसंद करण्या इतपत मी देखणा, श्रीमंत किंवा पहिलवान नव्हतो.

एक वेळ मी चांगली तब्येत केली असती, खूप शिकून श्रीमंत झालो असतो पण देखणा होणं अशक्य होत.

माझा रंग मी बदलू शकणार नव्हतो. किती जरी प्रयत्न केले तरी ही एक गोष्ट कधीच बदलणार नव्हतो.

अन् तरीही मी कळून पण न कळल्यासारखच वागत होतो.

नेमकी हिच गोष्ट बदलण्यासाठी मी धडपडत होतो. मला तेव्हा कळत नव्हत. मला फक्त तिचं प्रेम हवं होत.

अन् तिचं प्रेम मिळवण्यासाठी मला गोरं होण फार महत्वाचं होतं.

शाळेच्या रस्त्यावर एक मेडिकल लागायचं. मी पैसे साठवून दर वेळी एक क्रीम विकत घ्यायचो.

तिथल्या माणसाला माझा प्रॉब्लेम कळाला. त्याची अन् माझी चांगली गट्टी जमली.

दर वेळी तो माझ्यावर एका नवीन क्रीमचा प्रयोग करायचा.

काही क्रीम स्वस्त असायच्या काही महाग असायच्या. ज्या महाग असायच्या त्यांचे पैसे मी त्याला टप्प्या टप्प्याने द्यायचो.

त्यामुळे त्याची अन् माझी मैत्री आणखी घट्ट झाली.

दिवस जातील तसे माझ्या चेहऱ्यात फरक पडू लागला. चेहऱ्याचा काही भाग उजळू लागला.

लोकं मला नोटीस करु लागले. माझ्या सारखे लोक कोणती क्रीम वापरतोस म्हणून मला विचारू लागले.

मी फार खुश झालो.

एकदा तिने देखील मला नोटीस केलं. मला स्पष्टच विचारलं, "अभी चेहऱ्यासाठी काही वापरतोस का..?"

मी नाही म्हटल.

मला तिला या गोष्टी सांगून स्वतः चा कमीपना दाखवायचा नव्हता.

वैभ्या तर दर वेळी माझ्याकडे शंकेने बघत होता. एकदा तर त्याने सरळ विचारलंच, "त्या विश्र्ल्या मेडिकल वाल्याच्या नादाला लागला नाहीस ना.. शाणा नाही तो.. तुझ्याकडून नुसता पैसा काढून घेईल.. खर काय ते सांग.."

मी त्यालाही नाहीच म्हणालो. माझ्यात होणारा बदल हा देवाच्या इच्छेने होतोय असच मी त्याला दाखवू लागलो.

खरं देवाची इच्छा काय होती ते मला कळायला जास्त वेळ लागला नाही.

जितक्या वेगाने पॉझिटिव्ह बदल माझ्यात झाला तितक्याच वेगाने निगेटिव्ह बदलही होऊ लागला.

अचानक माझा चेहरा लाल होऊ लागला. माझी त्वचा लालसर होऊ लागली.

काही काही ठिकाणी लाल डाग उमटू लागले. हे लपविण्यासाठी मी पुन्हा नवी क्रीम वापरली.

प्रत्येक नव्या क्रीमचा नवा असर होऊ लागला. बघता बघता माझा चेहरा पूर्ण विद्रूप दिसू लागला.

चेहऱ्यावर लाल लाल धब्बे उमटू लागले. मान लालसर दिसू लागली. बाकीचं शरीर काळं अन् चेहरा तेवढा अर्धवट गोरा, अर्धवट लालसर दिसू लागला. मी आधी काळा असलो तरी छान दिसत होतो पण आता तर पूर्ण विद्रुप दिसू लागलो.

मला पाहणारे माझी चेष्टा उडवू लागले. गोरं होण्यासाठी मी काय केलं याची मस्करी उडवू लागले.

मला स्वतःला ते पाहवेना. मी हळूहळू लोकांच्यात जाणं कमी केलं. शाळेला जाणं कमी केलं.

वैभ्याने माझ्या नकळत खर काय ते बाहेर काढलं. विशाल मेडिकल वाल्याला एकट्याला धरुन चोप दिला.

घरात सगळं माहित पडलं तेव्हा मार बसला तो बसला वर पैसे मिळायचे देखील बंद झाले.

बाबांनी तर, “आता रहा असाच हीच तुझी शिक्षा” असं बोलून दाखवलं.

मी तर पुरता कोसळून पडलो. हे असं राहण अशक्य होत. मी आधी जसा होतो तेच माझ्यासाठी बरोबर होतं असंच वाटू लागलं.

प्रेम मिळवण्यासाठी मी हे काय करुन बसलो हे माझं मलाच कळेनास झालं.

रात्र रात्र रडून काढल्या तेव्हा कूठे आईने बाबांची समजूत घातली. माझा रडून रडून सुजलेला चेहरा बघून एकदाची त्यांना दया आली.

शेवटी चांगल्या त्वचा रोगतज्ञाकडे नेऊन मला दाखवलं. त्यांनी चांगली औषधं देऊन माझा उपचार सुरू केला.

हळुहळू माझा चेहरा पूर्ववत होऊ लागला. मी आधी सारखा काळा झालो. लालसर त्वचा निघून गेली. लाल पांढरे धब्बे निघून गेले.

आयुष्यात पहिल्यांदा मी माझा काळा रंग पाहून खूप खुश झालो.

आई बाबांनी मी पुन्हा असं काही करणार नाही हे माझ्याकडून वदवून घेतलं.

मी त्यांना शप्पथ घेऊन सांगितलं, “मी पुन्हा असं काही करणार नाही म्हणून.”

प्रेमात स्वतः चा रंग बदलण्यासाठी निघालेलो मी आता मला प्रेमच नको असं म्हणू लागलो.

जवळ जवळ महिन्याभराच्या अवकाशाने मी शाळेत गेलो. प्रत्येक जण माझ्याकडे चोरून पाहून हसत होता.

माझ्या ते लक्षात येत होतं. ती सुद्धा माझ्याकडे पाहत आहे हे मला जाणवत होतं.

पण आता तिच्यापासून दूर राहण्याचा मी निर्णय घेतला होता.

मला कळून चुकल होतं प्रेम तर मिळणार नाहीच पण मी स्वतः ला कूठे तरी हरवून बसलो असतो.

शाळा सुटली अन् घरी जाण्यासाठी निघालो. वैभ्या सोबतच होता. तो शांतच होता. दर वेळी वागतो तसा तो वागत नव्हता. माझ्या ते लक्षात आलं होतं. तरीही मी शांतच होतो.

आंबेडकर मैदानाजवळ आलो अन् समोर ती उभी दिसली. तिला समोरा समोर पाहून थक्कच झालो. किती तरी दिवसांनी तिला पाहत होतो.

कितीतरी बदल तिच्यात जाणवत होता. आधी पेक्षा ही जास्त ती सुंदर दिसत होती. कदाचित खऱ्या ऐश्वर्या राय पेक्षाही जास्त सुंदर. तीची एक बट पुन्हा तिच्या गालाशी खेळत होती. तिला पाहून माझ्या डोळ्यात नकळत पाणी आलं.

ती सरळ माझ्या समोर येऊनच उभी राहीली. मी तिची नजर चुकवत शांत मानेने खाली बघू लागलो.

“अभी.. प्रेम होत तर सांगायचं होतंस.. मी नाही म्हणाले नसते..”

मी चकित होऊन तिच्याकडे पाहू लागलो. वैभ्याकडे पाहिलं तर तो गालातल्या गालात हसत होता.

मला काही कळत नव्हतं. मी आश्चर्याने म्हणालो,

“काय..?”

“आता उगाच नाटक करू नकोस.. मला माहीत आहे.. तुझं प्रेम आहे माझ्यावर.. तुला काय वाटत मला कळत नव्हत का..?”

मी शांतच होतो. क्षणभरासाठी ती मस्करी करतेय की खरं बोलतेय हे समजून घेण्यातच माझं मन गुंतून गेलं होत. ती पुढे बोलू लागली.

“तुला काय वाटलं मी तुला नाही म्हणाले असते..? तू एकदा विचारून तरी पाहायचं होतस.. तू विचारलं नसतंस तरी मी स्वतः हून तुला प्रपोज केलं असतं.”

मी तर डोळे मोठे करुन तिला पाहत होतो.

“होय.. खोटं वाटतंय ना तुला..?”

मी होकारार्थी मान डोलावली.

“अभी रंग पाहून प्रेमात पडणाऱ्या मुलींमधली नाही मी. मी नाही म्हणेल म्हणून तू स्वतः चा रंग बदलायला निघालास होय..?”

“अभी प्रेम रंग पाहून करायचं नसतं मन पाहून करायचं असतं इतकं मला कळत.”

“आणि माझं तुझ्यावर प्रेम आहे तुझ्या रंगावर नाही.”

तिने असं म्हणताच माझ्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. वैभ्याच्या गळ्यात पडून मी रडू लागलो.हे खर की खोट हे कळायला मला वेळ लागला. काही वेळाने शुद्धीवर आलो. रडणं थांबवलं.

ती मला पाहून हसू लागली. मी लाजू लागलो. मी लाजत लाजतच विचारलं..

“मीच का.. माझ्यासोबतच का..?”

ती हसतच म्हणाली, “हेच मी तुला सुद्धा विचारू शकते.”

मी गालाताच हसू लागलो. वैभ्याने पाठीत मारत मला माझ्या चुकीची शिक्षा दिली..

“भावा नशीबवान निघालास..”

“तू सांगितलस ना तिला सगळं..?”

“मी फक्त तुझ्या क्रीमच सांगितलं.. तिनेच येऊन तुझ्यावर प्रेम असल्याचं कबूल केलं..”

आम्ही तिघेही हसू लागलो..

आज दहा वर्ष झालीत आमच्या लग्नाला. एक मुलगा, एक मुलगी अन् माझी ऐश्वर्या सुखात आहोत आम्ही. तेव्हा वाटलं होतं हे प्रेम जास्त वेळ टिकणार नाही. कदाचित पुढे मागे आमच्यात दुरावा येईल. पण तसं काही झालं नाही. ऐश्वर्याने दाखवून दिलं, प्रेम हे रंग पाहून नाही तर मन पाहून केलं जात.

तिच्या प्रेमरंगात मलाही तिने सामावून घेतलं.

••••


मरणाची घाई
अक्षय पोवार

# मरणाची घाई

विमला काकी म्हणजे माझी चुलत चुलत काकी (सख्खी नाही). जेमतेम बत्तीस वर्षांची. काकाचं आणि तिचं लवकरच लग्न झालं होत. तेव्हा काका पंचवीसचा अन् काकी अठराची. लग्नाचा संसार तरी चौदा वर्षांचा. लग्नाच्या बऱ्याच वर्षानंतर पिंट्या जन्मला.

काकी उंचीन मध्यम बांध्याची पण दिसायला सुंदर. अगदी गोरी गोमटी. पांढऱ्या जास्वंदासारखी. तब्येतीनं चांगली धडधाकट. आवाज अगदी नाजूक कोकीळेसारखा पण भांडताना मात्र गिरणीचा पट्टाच.

काका त्यामानाने अंगाने काटकच. उंचीला चांगला ताडासारखा उंच. काकाच्या सुरवातीच्या दिवसात म्हणे तो काकीला शोभून दिसायचा नाही. पण आता पाहिलं तर परिस्थिती नेमकी उलटी.

आता काकीच काकाला शोभून दिसेना अशी गत. (लाईफ इज अ सर्कल)

काकाचं सायकल पंक्चरच दुकान. दिवसाला आठ दहा मोटर सायकली पंक्चर करणार म्हणजे करणारच. (होय पंक्चरच) त्याशिवाय धंदा व्हायचा नाही. खरं काका मेहनती फार. सतत कुठल्या ना कुठल्या दौऱ्यावर असायचा. कधी तरी कडकी असायची पण काकीच्या रोजंदारीवरच्या कमाईवर सर्व निभवून जायचं.

सोबत हमखास शंभू तात्या. काकाचा सोबती. (लंगोटी यार) काकी म्हणायची, "शंभू म्हणजे माझी सवतच. बायको संग न्हाई पण मित्राबर जग फिरून येणार." काका कधी कधी हसण्यावारी न्यायचा. तसा तो ही शातीर.

कधी म्हेवणी गावी आली की तो ही म्हणायचा, "रेखा विमलीबर लगीन करुन घाईच केली म्या. तुझ्यासाठी जरा थांबाय पायजे हुतं."

काकीचा चेहरा मग लालभडक व्हायचा. काका काय मग लवकर घरात यायचाच नाही. यायचा तो सरळ मोगऱ्याचा गजरा घेवूनच. काकी मग गुलाबासारखी लाल लाल व्हायची. तसं दोंघाच्यात प्रेमही फार होत. असं काहीसं हसरं खेळतं वातावरण होतं.

माझं जास्त गावात येणं जाणं व्हायचं नाही. काकी राहायला जुन्या गावात. आमचं घर नव्या गावात. अंतर जेमतेम दोन किलोमीटरचं. माझं कधीतरीच जुन्या गावात जाणं येणं. त्यात इंजिनिअरिंगला इस्लामपुरात असल्यानं माझं राहणं हॉस्टेलवरच. त्यामुळं गावात फारच कमी येणंजाणं.

मागच्या यात्रेला गावात गेलो होतो तेव्हा काकीला पाहिलं होतं. तिला पाहून धक्काच बसला. एकदम हाडकुळी झाली होती. हीच आमची विमला काकी यावर विश्र्वास बसत नव्हता.

मी पाहतो आहे तेव्हापासून काकी अंगान चांगली जाडजूड. तिला कधी आजार म्हणून कुठला नाही.. साधं सर्दी पडसंही काकीपासून चार हात लांब.

तिला असं पाहून मी तर चक्रावलोच. चौकशी केल्यावर कळालं की सतत आजारी असते. काहीं ना काहीं होतच असतं.

मला फार वाईट वाटलं. काकी चांगली होती. मनमिळावू होती. कधी गावात गेलो की मन भरून बोलायची. चौकशी करायची. काही ना काही खायला करायचीच. काका सारखी नव्हती. (चेंगाट)

काकाला एकदा गावातला डॉक्टर सोडून चांगल्या दवाखान्यात दाखव असं मी म्हणालो होतो.

“तिला काय होतंय, एका गोळीत ती बरी होत्या.” कोणी विचारेल त्याला काका इतकंच म्हणत होता.

आजाराच निदान कधी झालंच नाहीं. अन् एके दिवशी आजार बळवला अन् काकी गेली.

मी तेव्हा कॉलेजवर होतो. त्या दिवशी माझी युनिट टेस्ट होती. मला चांगलंच आठवतंय, बॅग बाहेर ठेवायला म्हणून बाहेर गेलो तेवढ्यात बहिणीचा फोन आला, “भावड्या अरे काकी गेली.”

मी ऐकून सुन्न झालो. काय करावं ते कळेना. काकीचा चेहरा नजरेसमोर येऊ लागला. आता पाच मिनिटांत तर युनिट टेस्ट सुरु होणार होती. नाही म्हटलं तरी पुढचे दोन तास इथेच जाणार होते. त्यात मला लवकर सांगून पण मी गेलो नाही तर ते बरं दिसल नसतं. (खरं तर युनिटला हजर राहण्यापेक्षा मयताला हजेरी लावण जास्त महत्वाचं होतं - “लोक काय म्हणतील याची भीती”)

मी युनिट टेस्टचा विचार सोडला. (तसा ही अभ्यास काहीच केला नव्हता म्हणा) एवढं कोणी विचारणारं नव्हतं. सध्याच्या घडीला काकी महत्वाची होती. तिचं अंतिम दर्शन घेणं महत्वाचं होतं.

मी मित्राची गाडी घेतली अन् सरळ घर गाठलं. मोजून पाऊण तासात मी जुन्या गावात होतो. जाऊन बघतो तर सगळं उरकून झालं होत. एक माणूससुद्धा गल्लीत उभा दिसत नव्हता. मी चकीत झालो.

इतक्या जलद कोणाचा अंतिम विधी झाल्याचं माझ्या पाहण्यात नव्हतं. ऐकण्यात नव्हतं. माझ्या अठरा वर्षांच्या आयुष्यात असं कधी झालं नव्हतं.

मी पुन्हा दिदीला विचारून मस्करी करत नसल्याची खात्री केली. तिचा चिडका चेहरा आपसूक माझ्या नजरेसमोर आला. मी फोन तसाच ठेवला.

गाडी गल्लीतच एका बाजूला लावली. सगळया गल्लीत पाणी पाणी झालं होतं. बायका घरा समोरचा रस्ता धुवून निवांत झालेल्या. मला अजूनही विश्र्वास बसत नव्हता.

इतकी चपळता मी अठरा वर्षात कधीच पाहिली नव्हती. काकाच्या घरासमोर आलो. घर रिकामं रिकामं वाटत होतं. काही बायका आतल्या खोलीत होत्या. मला आमची दीदी तेवढी नजरेस आली.

काका बाहेर सोप्यातच बसला होता. एकटाच.

मला पाहून त्यानं रडवेला चेहरा केला. मी जाऊन काकाच्या गळयात पडलो. मला आलेलं पाहून गल्लीतली दोघंचौघ येऊन बसलीत. शंभू तात्याही होताच.

काका जरा स्थिर झाल्यावर मी चौकशी केली.

“अचानक.”

“व्हय न्हवं का. रातच्याला म्हटली काय बरं वाटंना. म्हटलं सकाळ पारी जाऊ चव्हाणाच्च्यात.. परसाकडनं आलो अन् जाऊ या म्हटलं.. गाडी काढतोय न्हव का मी.. तवर ती पडलीच खाली.. खाली पडली ती..”

“सपलीच जाग्याव..” शंभु तात्यानं नाक अन् तोंड एक करुन सांगितलं. काकाचं वाक्य त्यानं पूर्ण केलं. मी त्याच्याकडं बघतच राहीलो.

डॉक्टर काय म्हणाले.

“दवाखान्यात कुठं नेली तवा..”

“काय..?” माझ्या चक्कीत जाळ झाला.

“जाग्यावच सपली रं ती.. कशाला न्यायची मग..” शंभू तात्या पुन्हा डोळे मिचकावून तोंड वाकडं करुन बोलला.

काका शांतच होता. तो बोलायलाच मागेना.

“तरी पण काका एकदा बघायचं होत ना नेऊन.. काय झालेलं त्यांचं निदान तर कळालं असत..”

“अटॅक रं..” शंभू तात्या.

मी तात्याकडं नजर फिरवली. तात्या बोलू लागला.

“इष्ण्या कसा गेला तसंच झालं म्हणायचं ही. अटॅक आल्यावर माणूस जगतंय व्हय.. बरं झालं दवाखान्यात नाय नेली ती. उगा जा जा ये ये..” (डॉक्टर उगाच असतात नाही का)

मी बघतच होतो. मला वयाचा मान ठेवून जास्त बोलता येत नव्हत. (काका ही तसा शांतच होता. तोच बोलत नाही तर आपण काय बोलणार)

काही वेळ शांतच बसलो. कोणी काही बोललं नाही मग. काही वेळ बसून मी नंतर काकाचा निरोप घेतला.

निघताना एकच विचार मनात येत होता. यांना इतकी कसली घाई होती. काही जरी झालं तरी आपण डॉक्टरांच्या सल्ल्याने एक गोळी सुद्धा खात नाही. अन् इथं यांनी सरळ एका व्यक्तीला स्मशानात नेलं होतं.

तिला काय झालं, ती कशानं मेली हे सर्व स्वतःच ठरवून तिला अग्नीच्या स्वाधीन केलं होतं.

बर असं कोणी वारलं तर आपण नातेवाईकांना कळवतो. किमान आई-वडील-भाऊ-बहीण असतील तर त्यांना अंतिम दर्शन मिळावं म्हणून वाट पाहतो.

पण इथं नेमकं सर्व उल्ट झालं होतं. काकीची बातमी कळाली तेव्हा तिला जाऊन दहाच मिनिटे झाली होतीत. मला घरी पोहचायला साधारण एक-दीड तास लागला असता, तरी मी पाऊण तासात पोहोचलो होतो.

मी हाच विचार करत होतो की, इतक्या जलद अंतिम कार्य कसं काय होऊ शकत. इतकी मरणाची घाई नेमकी कोणाला होती. (त्याची गरजच काय होती)

“हे देवा ऽ..” मला तर काहीच कळत नव्हत.

कार्य होईपर्यंत गावात येत जात होतो. खरं सांगायचं तर काकाला एवढं दुःख झालंय असं मला तरी मनापासून वाटत नव्हतं.

काळ त्याच्या गतीने पुढे सरकला. बघता बघता काकीला जाऊन सहा महिने झाले.

दुसऱ्या सेमीस्टरची युनिट टेस्ट आली होती. वर्गातच बसलो होतो. पुन्हा दीदीचा फोन आला.

मला देजा वू चा साक्षात्कार झाला. सारखीच वेळ. युनिट टेस्ट. दिदीचा फोन. पुन्हा वाईट बातमी मिळतेय की काय. मी घाबरत घाबरतच फोन उचलला.

“बोल की दिदे..”

“भावड्या अरे काका..”

“काय झालं..?” (होय माझ्या मनातही तेच आलं)

“काकानं अरे लग्न केलं.”

“काय..?” (माझ्या चक्कित पुन्हा जाळ)

“होय अरे.”

“कधी..?”

“कधी केलंय कुणास ठाऊक अरे. कुणालाच सांगितलं नाय का काय नाय.”

“पप्पा कुठायत..?”

“गावात गेल्यात दोघं पण..”

“कुणी सांगितलं तुला..?”

“कमळा आज्जी आलती सांगत म्हणत होती, “काकीची भन करून आणल्या विलश्यान. शंभ्या बर कवा गेला अन् तिला घिवूनच आला.”

“रेखा काय..?”

“होय अरे.. बघ की.. अजून वर्ष पण झालं नाय आणि..”

मी गालात हसत होतो. माझ्या मनात भलतेच विचार येत होते. (होय तेच विचार)

“बर दीदे मी करतो तुला फोन.. वर्गात आहे मी आता..”

“बर बर.. ठेवते.. काळजी घे.. नाश्ता केलायस ना..?”

“होय होय.. बोलू परत चल..”

फोन कट झाला. माझं विचारचक्र सुरू झालं. टेस्ट मधले प्रश्न सुटत नव्हते पण मनात सुरु असलेले प्रश्न हळूहळू सुटत होते.

वर्षभर काकीन आजार अंगावर काढला. काकान ही लक्ष दिलं नाही. (का ते आता कळत होतं)

एकाएकी ती गेली असं काका म्हणतो पण तीचं हे जाणं असं एकाएकी नव्हतं. (घडवून आणलं होतं)

काय खरं काय खोटं हे देवालाच माहीत होत. पण जो तो आता हेच बोलत होता. “विलश्यानच, “___ ”. (नाही मी नाही बोलू शकत)

“विलश्यान मुद्दाम लक्ष नाही दिलं.. सारखं आपलं ही गोळी खा बरी हुत्यास, ती गोळी खा बरी हुत्यास..”

एकदा चांगल्या दवाखान्यात जाऊन इलाज केला असता तर कदाचित काकी बरी झाली असती. (कदाचित त्याला हेच नको होत)

मला आता नेमकं हेच कळत नव्हत की,

“मरणाची घाई नेमकी कोणाला होती.”

••••



# चतकोर भाकरी

अक्षय पोवार

# चतकोर भाकरी

आज बरोबर आठ दिवस झाले मला घरी येऊन. मागच्या बुधवारी एकाएकी रात्रीचं पोटात दुखायला लागलं अन् आता मरणारच मी असंच वाटू लागलं. मित्रांनी तातडीने जवळच्या इस्पितळात नेलं अन् उपचार सुरू झाले. मध्यरात्री पर्यंत कळ जरा कमी आली. अचानक काय झालं ते मलाही कळेना.

असं एकाएकी आलेलं दुखणं मनाला चटका लावण्यासारखं होतं. कारण असं कधीच झालं नव्हतं. सतत बाहेरचं खाणं झाल्यामुळे असेल असा डॉक्टरांचा कयास होता. "आता बाहेरचं खाणं बंद करा आणि दोन चार दिवस जरा हलकंच जेवणं घ्या" असं त्यांनी बजावलं. मित्रांनी तर "तू आधी घरी जा आणि चांगलं चेकअप करून ठणठणीत बरा होऊनच पुण्याला ये" म्हणून दुसऱ्या दिवशीच मला घरी पाठवलं.

घरी आल्याबरोबर कुटूंबाने काळजी दाखवली पण जेवण सोडून बाहेरचं खाणं जास्त खातो म्हणूनच आजारी पडलास असं सुनावूनही दाखवलं. विशेषत: आईने. तिच्यापासून काय लपणार. मुलगा लांब जरी राहत असला तरी जेवला की नाही हे माझ्या आवाजावरूनच तिला कळत होत.

दुसऱ्या दिवशी घरी आल्याबरोबर वडिलांनी सोनोग्राफीतेन करूनच घेऊ म्हणून चांगल्या दवाखान्यात नेलं. तेही रिपोर्ट नॉर्मल आले. सर्व काही नॉर्मल

असताना नेमकं एकाएकी कशामुळे पोटात दुखायला लागलं तेच मला कळेना. त्या दिवसभरात मी काय काय खाल्लं हे बसल्या बसल्या मी सारखं आठवण्याचा प्रयत्न करत होतो. पण विशेष काही खाल्याचं मला आठवत नव्हतं.

सकाळी फ्रेंड्स मधल्या तीन-चार वड्यांवर ताव मारला होता. मेसच्या डब्यात कोबीची भाजी अन् बिनाडाळीचं गार पाणी बघून भरलेला डबा तसाच पुन्हा हौदाजवळच्या गटारात रिकामा केला होता. नेहमीप्रमाणे अशोकवरच अंडाकरी अन् तीनच रोट्या खाल्या होत्या. संध्याकाळच्या सुमारास पण चहा-पोहे इतकंच अन् पुन्हा रात्री मेसवर जाऊन बिनाडाळीचं गरम पाणी अन् काळया वाटाण्याची भाजी इतकंच काय ते.

नेमकं काय झालं अन् पोटात दुखायला लागलं हे मला काही कळेना. विचार करून करून डोकं आता ठणकत होतं. रिकामं घरी देखील बसू वाटत नव्हतं. बाहेर जावावं तर आईचे डोळे गरगर फिरत असल्याचे दिसत होते.

तिला माहित होतं हा बाहेर गेला की पुन्हा काहीतरी अचरट खाणारचं. म्हणून तिने स्वत:ची शपथच मला खाऊ घातली होती. तिचं यावरूनच रागावणं असायचं की, “बाहेर हु ऽ म्हणून खायचं अन् घरी केलेलं काय मग टाकून द्यायचं.” तिच्या टाकून द्यायचं या वाक्याबरोबर ती असं काही माझ्याकडे बघायची की मला एकदम धस्स ऽ व्हायचं.

रोजरोज मेसचा डबा टाकून देतो हे चुकून आईला कळालं की काय, मला असंच वाटायचं. पण या गोष्टी तिला सांगणारं असं कोण तिच्या संपर्कात नव्हतं. मुळात मी दिवसभरात काय काय करतो हे देखील तिला माहित असणं शक्य नव्हतं. कोणाचचं माझ्यावर लक्ष्य नव्हतं. तरी देखील नकळत माझ्याही मनात हा विचार

येऊनच जायचा की, “कदाचित अन्नाची नासाडी करतो म्हणून तर माझ्या पोटात दुखायला लागलं नाही ना ?” पण मी तसल्या सर्व शक्यता नाकारून माझ्या मनाला जे बरं वाटेल तेच स्वत:ला सांगत राहायचो.

बराच वेळ काही खाल्लं नाही म्हणून स्वयंपाकघरात काही खायला दिसतंय का म्हणून गेलो अन् पाठीमागच्या आळीतून जोरजोरात कोणी तरी भांडत असल्याचा आवाज येऊ लागला. मी आधी खिडकीतूनच कानोसा घेण्याचा प्रयत्न केला.

बराच वेळ ऐकल्यानंतर कोणी तरी माणूस ओरडून ओरडून काय काय बोलत होता. नेमकं कोणाला बोलत होता माहित नाही पण त्याच्या एकट्याचाच मोठमोठ्याने ओरडण्याचा आवाज येत होता. ओरडणं कसलं, नुसत्या आईबहिणीवरून शिव्याच होत्या.

काय चालंलय हे जवळ जाऊन पाहूया असं मन म्हणत होतं खरं आईचे भिरभिरणारे डोळे पायांना अडवत होते. मी खिडकीजवळ उभा राहूनच पलीकडील परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो.

बऱ्याच वेळाने शिव्यांचा पाऊस ओसरला. एकदमच शांतता झाली. कदाचित आता मिटलं असेल म्हणून मी पुन्हा आमच्या सोप्यात यायला निघालो तोच काही तरी आदळण्याचा आवाज आला. मी जागीच थांबलो. खिडकीतून काही दिसतंय का ते पाहू लागलो.

आमच्या घराच्या पाठीमागच्या एका घरात हा सर्व प्रकार सुरू होता. यापूर्वी असं काही झाल्याचं मला आठवत नव्हतं. त्यामुळेच नक्की काय झालंय हे जाणून घ्यायला मी बेचैन होत होतो.

आवाज आला म्हणून पाहिलं तर कोणीतरी जर्मनची ताटी रस्त्यावर फेकून दिली होती अन् त्या ताटीतलं दुधं रस्त्यावर सांडलं होतं. असं जेवणाचं ताट सरळ रस्त्यावर फेकून देण्याइतपत काय झालं असावं हे जाणण्याकरिता मी आणखीनच बेचैन होऊ लागलो. दार बंद करण्याचा आवाज आमच्या स्वयंपाकघरापर्यंत आला. मी ते सर्व पाहत होतो.

माझी नजर एका सावलीवर खिळून होती. एक सावली. एक वृद्ध सावली. त्या वृद्ध स्त्रीची पाठमोरी बाजू मला दिसत होती. ती सोनाक्का होती. आमच्या पाठीमागच्या घरात राहणाऱ्या आबाची ती आई होती. आबानं असा रागराग करणं, जोरजोरात ओरडणं अन् शिव्या देऊन असं सोनाक्काला बाहेर काढण्याइतपत काय झालं असावं असे बरेच प्रश्न माझ्या मनात उभे होत होते.

मी काहीच नाही केलं. तसाच कायकाय होतय ते पाहत राहिलो. सोनाक्का बसल्या बसल्याच पुढे पुढे येत होती. तिचा सुरकुतलेला चेहरा तिची नव्वदी सांगत होता. आमच्या घरापासून त्या घरापर्यंत जाण्यासाठी एक बारीकशी पाऊलवाट होती.

मोठमोठी दगडं अन् काट्याकुट्या टाकून ती वाट बंद करण्याचा प्रयत्न केला होता तरी ती काही बंद झाली नव्हती. मागच्या आळीत जाण्यासाठी बारकीसारकी पोरं हमखास तिथूनच जात होतीत. सोनाक्का हातात जर्मनची ताटी घेऊन कशीबशी रांगत रांगत मोठ्या दगडापाशी येऊन सावलीत बसली. रस्त्यावर सांडलेल्या दुधभाकरीच्या तुकड्यांवर तिची नजर खिळून राहिली होती.

मला काय करावं तेच कळेना. तिची लगेच जाऊन विचारपूस करावी तर ती वेळ योग्य नव्हती. ती ज्या घरात राहत होती ती माणसं माझ्या चांगली ओळखीची

होती. पण आबानं दिलेली त्यांची ही आजची ओळख माझ्यासाठी नवी होती. त्यांना मी असं कधीच पाहिलं नव्हतं. ते ही सोनाक्काशी, त्यांच्या स्वत:च्या आईशी असं शिवराळ भाषेत बोलताना, रागवताना, ओरडताना.

सोनाक्का ज्या अर्थी सर्व ऐकून घेत होती किंवा गप्प होती त्यावरून तरी मला तिचीच चूक असावी असं एका अर्थी वाटत होत. पण तरीही तिच्यासाठी वाईट वाटत होतं. ती एकटक हातातल्या ताटाकडे टक लावून पाहत होती. वाळत चाललेलं दूध बोटावर घेण्याचा प्रयत्न करत होती. पण तिच्या बोटाला काहीच लागत नव्हत.

मला एकदमच कसंतरी झालं. मी बुटीत काही आहे का ते पाहिलं. चतकोरच भाकरी होती. मी तीचे पटकन तुकडे केले अन् कोमट दूधात भाकरी कुसकरली. स्वयंपाकघराचं दार लावून सरळ तिच्या दिशेने चालत गेलो.

मी तिच्या जवळ गेलो तरी तिला शुद्ध नव्हती. मी त्या घराच्या दिशेने कोणी नसल्याची चाहूल घेतली अन् पलीकडे गेलो. तिच्याजवळच बसलो. हातातलं ताट तिच्यासमोर धरलं.

ती क्षणात शुद्धीवर आली. तिच्या बुबूळांची वेगाने हालचाल झाली अन् हातानं वेग धरला. थरथरतेल्या हाताने ती एक एक घास खाऊ लागली. दुधाचे ओघळ तिच्या तोंडातून हनुवटीपर्यंत येत होते. ती तशीच हाताने पुन्हा ते तोंडात घालत होती. तिचं माझ्याकडे लक्षच नव्हतं.

समोर कोण आहे कोण नाही हे मुळी तिला जाणूनही घ्यायचं नव्हतं. तिच्या भुकेल्या देहाने संपूर्ण जोर त्या थरथरतेल्या हातांना दिलेला. जणू तिच्या पोटाची भूक

तिच्याकडून सर्व काही करून घेत होती. अन्नासाठी होणारा तिचा थरकाप तिच्या भूकेची जाणीव करून देत होता.

मी फक्त पाहत होतो. मला काही सुचत नव्हतं. तिच्या हालचालींवरून ती किती दिवसांची उपाशी आहे याचा कयास लावण्यात माझं मन गुंतलं होतं.

तिने काही मिनिटांत सर्व फस्त केलं. तोंडावरचा ओघळ पुन्हा हाताने पुसून घेतला. बारकी पोरं आपला आवडीचा पदार्थ जसा बोटं चाटून पुसून खातात तशी ती थरथरत्या हाताने एक एक बोट ताटाला पुसून तोंडात घालत होती. मग एकाएकीच ती थांबली. जणू काही तिला कशाची तरी चाहूल लागली. घाबऱ्याघुबऱ्या नजरेने तिने माझ्याकडे पाहिलं अन् जा जा म्हणून मला इशारा करू लागली.

ती माझ्या गालाला हात लावून मला सतत तिथून जा म्हणून खुणवून सांगू लागली. मी पाणावलेल्या डोळ्यानेच तिथून वेगात आमच्या घरात आलो. दार लावून घेतलं. अन् खिडकीतून पाहू लागलो.

ती पुन्हा आधी बसली होती तशीच शुन्यात पाहत बसून राहिली. चंद्राक्का दार उघडून आली अन् मागच्या दारात झाडलोट करू लागली. तिची त्रासिक नजर अधून मधून सोनाक्कावर जात होती. ती बराच वेळ तिथ काय काय काम करत राहिली. मग मी तो विषय तात्पुरता सोडून दिला अन आमच्या सोप्यात येऊन बसलो.

बरेच प्रश्न मनात उभे राहिले होते. सोनाक्काचं असं काय चुकलं असावं म्हणून तिच्यावर इतका राग यावा अन् तिला असं उपाशी ठेवण्याइतपत असं झालं तरी

काय असावं अन् त्याउपरही कालपरवापर्यंत साधीभोळी वाटणारी माणसं अशी राक्षसासमान का वागावीत हा सवाल स्वस्थ बसू देत नव्हता.

बाहेरून आई घरी येताच मी तिला सोनाक्काबद्दल विचारणा केली. गेल्या वर्षभरात तिची तब्येत फारच खालावली होती. अधूनमधून ती सतत आजारी पडत होती. डॉक्टरांनाही तिच्या आजाराच निदान काही मिळत नव्हतं. तिच्या सततच्या आजारपणाने चंद्राक्का अन् आबाही कंटाळले होते. वयोमानानुसार तब्येत साथ देत नसणार असंच बोलणं माणसांतून ऐकायला मिळत होतं.

तरी न राहवून मी आईला तो प्रश्न विचारलांच.

“खरं मम्मे, आपल्याच आईला आबा उपाशी का ठेवल आणि नको नको तसल्या शिव्या का दिल काय तर चुकलं असणारच की सोनाक्काच.?”

“चुकलंय की, त्या आब्याला जन्म देऊनच चुकलंय म्हातारीच. वाटलं नव्हतं असं असंल म्हणून. म्हातारं माणूस हाय म्हणून जरावाईच तरी समजून घ्यायचं.. माणूस म्हणायचां का हैवाण”

“मी काय विचारालोय ते आधी सांग की ?” मी आईला मध्येच अडवत म्हणालो.

“काय सांगू तुला आता ?”

“जी झालंय ती सांग उगाच लांबड लावू नको. तिला उपाशी का ठेवत्यात ते सांग ?”

“आता काय सांगायच तुला.. माणूस म्हातारं झाल्यावर असंच हाल असत्यात बाबा.. प्वॉट बिघडलं म्हणून पाताळातच म्हातारीन हागून ठेवलं. ठेवलं ती ठेवलं, हागलेल्या पाताळातनं सगळ्या घरभर फिरली. कमी म्हणून की काय त्यात म्हातारीन

त्या हुबलाकाच्या इजारीनंच पुसून घ्यावी का समदी घाण.. त्यो माणूस आलां कुठनं हुंदडून.. इवून बघतो तर काय, सगळ्या घरात म्हातारीन हागून ठेवलंय.. मग काय बाबा, बदड बदड बदडली की म्हातारीला.''

''एवढ्यावरनं तीच ही हाल होय.''

''व्हय तर. तवापासनं बग खायालाच दित न्हाईत तिला.''

''का ?''

''असंच की.. खाल्लं की सगळ्या घरात हागून ठिवतीया बया.''

''मग तिला संडासात का बसवत नाय ?''

''कोण काढणार तिचं हागमूत. कुणाला टाइम हाय तिथं. ह्यो आमदारलवड्याचा पडला नाय का. मारली किक की गेला डुगडुग करत.. अन् ती चिचुंद्र्या तोंडाची टवळी, तिला नको का टाइम चांभारचौकश्यातनं. दिसत्यात तशी नाय बाबा. म्हणायला तेवढी सुशिक्षित हायत. खर किती आतल्या गाठीची हायत तुला न्हाय म्हाईत.''

''मग तिला खायला कोण देतय ?''

''कोण देणार. मी कवा कवा तर अधनंमधनं दित हुतो खरं त्यासनी नाय पटत. शिव्या घालत्यात घाणघाण.''

''तुला कोण काय बोललं काय ?''

''मला कशाला कोण बोलाय येतंय. त्यांच्या माघारीच दित हुतो तिला खायला. खरं तरीबी शिव्या घालत्या ती चिचुंद्री दारात उभी राहून. अन् आता तर तिथं जायचां सवालच ईत न्हाय. त्या भाड्यानं वाटंच बंद केल्या.''

क्षणभर मी शांतच राहिलो.

“तू का मधीच तिच्याबद्दल विचारायला लागलास ?”

“काय नाय आवाज याल्ता मागनं म्हणून बघत होतो. सोनाक्का दिसली दगडाच्या आडोशाला बसलेली.”

“तू काय जाऊ नको तिथं. त्यो बाबा नाय शाणा. उगं काय तरी पाट्‌ दिशी म्हणल. उगं भांडणाला कार नको.”

“मी आलो कवाच जाऊन.” मी चोरट्या नजरेनेच म्हणालो.

“कवा ?”

“मगाशीच”

“का गेल्तास ?”

“सोनाक्का बसल्याली रडत. आबानं ताट दिल्त फेकून रस्त्यावर. दूध भाकरी कुसकरली अन्‌ गपचिप आलो दिवून.”

आई शांत नजरेनेच पाहू लागली अन्‌ म्हणाली,

“आता दिलंस तेवढं बास झालं परत काय जाऊ नको. ती माणसं न्हाईत श्याणी. वाट्टंल तसं बोलत्यात. तुझ्या बापाला ती काय खपायचं न्हाय. उगं भांडणाला त्वांड नको फुटाय.”

“असू दे. चतकोर भाकरीन काय हुईत नाय. त्यासनी जड असंल तर आम्ही घालतो म्हणाव खायला. बगू काय करत्यात.”

“ए बाबा.. ऐक जरा सांगत्यालं.”

“असू दे.”

“आत्ता ऽ“

“तिच्या जागी तुझी आय असती तर ?”

“आरं कळतंय की मला. मी पिण दित हुतो की खायाला. खरं म्हातारी आल्या आता घाईला. जरा वाईच काय खाल्लं कि पाताळ घाण करत्या. मारत्यात रं तिला लय. नाय ऐकू वाटंत त्या शिव्या.”

“असं का करत्यात खरं. मधनंच काय झालं त्यासनी असं वागाय ?”

“भागलं ना आता समदं. आयबापाकडनं मिळालं समदं. आता काय उपयोग हाय त्यांचा. असंच असतंय बाळा, म्हातारपण लय वाईट.”

मी शांत बसूनच शून्यात पाहत राहिलो. आई आतल्या खोलीत केव्हा उठून गेली मला कळालं सुध्दा नाही. कालपरवापर्यंत सोनाक्का चांगली हसत खेळत असायची.

मी कधी सुट्टीला घरी आलो की मुकं घेऊन घेऊन माझी चौकशी करायची. रानातनं आणलेलं एखाद दुसरं कणीस मला खाऊ घालायची. “पोरा लगिन तेवढं कर बाबा आता” म्हणून सारखी माझ्या मागे लागायची. मला फार बरं वाटायचं.

ती परकी असल्याची भावना मला कधी शिवली नव्हती. खरं असं अचानक तिच्या वाटेला आलेल्या दु:खानं मी तर येडबडून गेलो होतो. तिला अश्या अवस्थेत पाहून माझं मला कळायचं बंद झालं होतं. आबाच्या शिव्या अजून कानात घुमत होत्या. त्यानं फेकलेलं ताट अजून डोळ्यासमोर गोलगोल फिरताना दिसत होतं. सोनाक्काचा भुकेला चेहरा माझ्या काळजाला रडवत होता.

मला हे खरं तर बघवत नव्हतं. जाऊन आबाला दोन खडे बोल सुनवावे असंच वाटत होतं. पण आबाचं वय आड येत होतं. लहानतोंडी मोठा घास घेण्याचं धाडस होत नव्हतं. मी आमच्या घरच्यांना आबाला जाऊन समजवा म्हणून सतत सांगत होतो. खरं त्यांच एकच म्हणणं होतं, “आम्ही बाबा सांगून सांगून दमलो, त्यो काय ऐकणाऱ्यातला माणूस न्हाय. आता म्हातारीचं नशीबच फाटकं म्हणायचं.”

मला हे अजिबात पटत नव्हतं. पण बाकीच्या लोकांचं पण बरोबरच होतं. ज्याने त्याने गोडीगुलाबीने आपआपल्या परिने आबाला समजवण्याचा प्रयत्न केला

होता. पण त्याच्यात काही सुधारणा होत नव्हती. मी नको ते धाडस न करण्याचा आमच्या घरच्यांचा दबाव होता. अन् तसंही मीही काहीच करू शकत नव्हतो.

अधून मधून मी आमच्या पाठीमागच्या दारात जाऊन सोनाक्का दिसते का ते पाहत होतो. ती तिथेच दगडाच्या आडोश्याला बसलेली असायची. मी दिसलो की मला कळवळलेल्या चेहऱ्यानेच बोलवायची. पाची बोटं तोंडाजवळ घेऊन “मला भूक लागल्या” म्हणून खुणवायची. तिची ती अवस्था बघून मन व्याकूळ व्हायचं.

कोणी नाही ते बघून मी अधून मधून सोनाक्काला दूध भाकरी देत होतो. दोन-पाच मिनिटं तिच्या जवळ बसत होतो. पण तिच्यासोबत मन भरून बोलणंच होत नव्हतं. जरा कोणाची चाहूल लागली कि ती जा जा म्हणून मला पाठवून द्यायची. घाबरलेल्या त्या स्थितित तिची वाचा सुद्धा निघायची नाही. हातपाय भितीने थरथरू लागायचे. तिची ती अवस्था पाहण्यासारखी नसायची.

म्हातारपणातल्या शरीराने तिची साथ देणं सोडून दिलं होतं. अंगावर मांस म्हणून काही राहिलं नव्हतं की कुठल्या अवयवात त्राण राहिला नव्हता. हातपाय नुसते थरथरत होते. डोळ्यांची बुबूळं नुसती खोलखोल जात होतीत. मधूनच येणारी पोटातली कळ तिचं पाताळ पिवळभडक करत होती. तिच्या आजारावर औषधपाण्याचा गुणंही येत नव्हता. जिथं तिचं मनच मेलेलं तिथं तिच्या शरीरावर तरी कशाचा उपाय होणार होता.

कित्येक दिवस कोणाच्यातच कोणताच बदल होत नव्हता. सोनाक्कांच शरीर साथ देत नव्हतं की आबाच्या शिव्या कमी होत नव्हत्या. जे चालंलय तसंच चालत होतं.

सोनाक्काला पाहिल्यापासून माझ्या पोटातली कळ छातीत येऊन बसली होती. त्या दिवसापासून मला अन्नाची खरी किंमत जाणवली होती. एका अदृश्य शक्तीने दिलेला इशारा माझ्या चांगलाच जिव्हारी बसला होता.

आता माझ्या पोटाचं दुखणं बंद झालं होतं. अन् माझे सर्व रिपोर्टही नॉर्मल आले होते. आता आजारपणासाठी थांबून चालणार नव्हतं. नोकरीधंद्याच्या माणसाला आजारपण मिरवून चालत नसतं. जास्तीत जास्त आठ दिवसच मला गावी राहता आलं होतं.

उद्या सकाळी माझी पुण्यासाठी बस होती. खरं मला जाऊ वाटत नव्हतं. आपण गेलो की सोनाक्काच काय अशी सारखी चुणचूण लागत होती. मी कळवळून आईकडं पाहिलं, तिनं नजरेनंच "दिन मी तिला अधनमधनं खायाला" म्हणून उत्तर दिलं होतं.

शरीर पुण्याला पोहोचलं होतं पण मन सोनाक्का जवळच घुटमळत होतं. इथं आल्यापासून आईजवळ सतत तिची चौकशी करत होतो. फक्त एकदाच मला ऐकायचं होतं की सोनाक्का आता बरीय म्हणून. खरं दरवेळी तिच्या खालावलेल्या तब्येतीची बातमीच कानी पडत होती.

पुढच्या चार दिवसातच आईने ती गेल्याची बातमी कळवली. ऐकून मन कळवळलं. पण एकाअर्थी तिची सुटका झाली म्हणून बरंही वाटलं. नंतर एके दिवशी न राहवून आई बोलून गेली, "मातीदिशी कावळ्यानं काय घास शिवला नाय बाबा, तात्याची गय आणली अन् तिनं चतकोर भाकरी तेवढी खाल्ली.

••••


अदृश्य वेदना
अक्षय पोवार

# अदृश्य वेदना

हातातल्या भाजीच्या पिशव्या त्याने स्वयंपाकघरात जाऊन ठेवल्या. तांब्याभर पाणी घेऊन सोफ्यावर बसला. गट्ऽ गट्ऽ आवाजात एका दमात पाणी पिलं.

चार माळे चढून चांगलाच दमला होता तो. दमलेल्या नजरेनेच घरभर नजर फिरवली. नजरेला दिसत होता तो नुसता पसारा अस्थाव्यस्थ पडलेला! थोडा श्वास घेतला अन् घर आवरू लागला.

पोरीची पडलेली खेळणी, तिच्या बाहुल्या व्यवस्थित त्यांच्या त्यांच्या जागेवर ठेवल्या. धुवायची कपडे गोळा करून वॉशिंग मशिनमध्ये टाकलीत.

मशिन चालू करून बाकीचं काम उरकायला घेतलं. बेसिनमध्ये पडलेली खरकटी भांडी धुतली. गॅस आणि किचनकट्ट्यावरून फडकं फिरवलं. हॉलमधलं अस्थाव्यस्थ पडलेलं सामान जागोजागी ठेवलं.

बिछाना व्यवस्थित केला. कपड्यांच्या घड्या घालून कपाटात ठेवल्या. खिडकित ठेवलेल्या फुलझाडांना पाणी घातलं. सगळं घर चांगलं झाडून घेतलं.

फिनेलच्या पाण्यानं चांगला पोथा मारून घेतला अन् तसाच मोठमोठे श्वास घेत जमिनीवरच पडून राहिला.

आज सकाळीच तो गावावरून आला. तो आला अन् ती घाईतच कामावर निघून गेली.

धड नीट भेटताही आलं नाही अन् बोलताही आलं नाही. आल्या आल्याच मोठ्या मुलीची शाळेला जाण्याची तयारी सुरू झाली.

घाई-गडबडीत पोरीचं उरकलं. तिची वेणी बांधत बांधंत तिला नाष्टा करून दिला. रात्रीच दोन चपात्यांच मळून ठेवलेलं पीठ फ्रिजमधून काढलं अन् दोन चपात्या करून घेतल्या. रात्रीची भाजी गरम करून भाजी-चपाती डब्यात भरली.

मुलीला घेऊन पळत पळतच गेटसमोर जाऊन उभा राहिला. शाळेची बस वेळेत मिळाली अन् त्यानं नि:श्वास सोडला.

तिसऱ्या माळयावर पोचताच बारकीचा रडण्याचा आवाज कानावर आला अन् त्यानं धूम ठोकली. पळत पळत जाऊन धडपडत दरवाजा उघडला अन् तिला मिठित घेतलं.

घड्याळाकडे नजर टाकली अन् तिची नर्सरीला जाण्याची तयारी सुरू केली. बाथरूमच्या दारापासून ते नर्सरी शाळेच्या दारापर्यंत होणारी सर्व तयारी झाली.

खाऊनं अन् फळांनी भरलेली तिची बॅग घेऊन जवळच्याच नर्सरी शाळेत तिला सोडून आला. पुन्हा फेरी नको म्हणून येता येता बाजार करतच आला. दम टाकत टाकतच इमारतीचे चार मजले चढला अन् 'मिरामुकूंद' ची पाटी असेलेलं दार उघडलं.

आयुष्यानं त्याच्या वाट्याला दु:खच जास्त आणलं होतं. न कळणाऱ्या वयात आजारपणानं सोडून गेलेल्या आईचं दु:ख.

घर सांभाळण्याच्या देखरेखीत गमावलेलं हसण्याखेळण्याचं दु:ख. अर्ध्यापोटी राहून केलेल्या मजुरीचं दु:ख. वाढत्या वयातल्या जबाबदारीनं हिसकावलेलं शिक्षणाचं दु:ख.

गरीबीच्या दिवसांनी आणि दारिद्र्याच्या रात्रींनी सट् सट् चाबकाचे फटके मारत मोठं केल्याचं दु:ख.

शिक्षण कमी असल्यानं मुकूंदला चांगल्या पगाराची नोकरी मिळवणं अवघड गेलं. पण कुठंतरी पुण्य कमावलं होतं म्हणूनच की काय वडिलांच्या ओळखीनं कारखान्यातली सुपरवायजरची नोकरी मिळवणं सोप्प गेलं.

आत्तापर्यंत लग्नाचं वय झालं होतं खरं लग्न करण्यासाठी सोबत कोण नव्हतं. अपेक्षांच्या किंमतीपुढे चारित्र्याची किंमत मेळ घालत नव्हती.

वाढत जाणाऱ्या वयामुळे नैराश्याची दरी रात्रंदिवस आत-आत ओढतच होती. पण म्हणतात ना कुणासाठी कोणतरी बनलेलचं असतं! तसंच काहीसं झालं अन् मिरा नावाच्या समुद्रानं नैराश्याची लाट परतवून लावली.

काहीतरी देण्याच्या बदल्यात काहीतरी हिसकावून न घेणारं ते आयुष्य कसलं! लग्न तर झालं परंतु बायकोच्या सरकारी नोकरीमुळं त्याला कारखान्यातली नोकरी सोडून, वडिलांना भावंडांना सोडून, गावापासून दूर मुंबईत यावं लागलं.

जुन्या स्पर्धेला नावं ठेवलीत म्हणूनच की काय आयुष्यानं नव्या स्पर्धेत उतरवलं. अन् लग्न नावाच्या चाबकाचा एक प्रेमळ फटका मारत नव्या जोखमीपुढं उभं केलं.

मोबाईलची रिंग वाजू लागली अन् त्यानं डोळे उघडले. अर्धवट झोपलेल्या अवस्थेतच मोबाईल कानाला लावून बोलू लागला.

"हां ऽ"

"झोपलायस ?"

"ह्म्म ऽ"

"काही नाही. पिऊला मी घेऊन येते. तेच सांगायला फोन केलेला."

किती वाजले बघायला म्हणून त्याने डोळे पूर्ण उघडले अन् ताडकन उठूनच बसला. अंघोळपाणी उरकून रात्रीचं राहिलेलं जेवण गरम केलं अन् जेवायला बसला. भूक होती खरं जेवण जात नव्हतं. दोन दिवसापासून सतत छळत असलेली वेदना घास घश्याखाली जाऊ देत नव्हती. त्यानं तसंच ताट स्वयंपाकघरात जाऊन ठेवलं अन् पुन्हा झोपी गेला.

संध्याकाळी मुलींच्या आवाजानेच त्याला जाग आली. दोन दिवसानंतर आलेल्या आपल्या बाबाला पाहून दोन्हीही मुली खुशीतच होत्या.

तिने पोरींचा "बाबा-बाबा" म्हणून चाललेला गोंधळ ऐकला अन् स्वयंपाकघरातून बाहेर येत विचारलं, "झाली झोप ?"

"ह्म्म ऽ" त्यानं नुसतीच हसून मान डोलावली.

"तरी तुला सांगत होते मुकूंदा, नको त्या एसटीने येऊस. धड बसायलाही नीट मिळणार नाही."

तो काहीच बोलला नाही. मुलींसोबतच खेळू लागला.

"जेवला नाहीस सकाळी. चल उठ आवर. आधी जेऊन घेऊया."

तिने पटपट गरम गरम जेवण वाढायला घेतलं. फ्रेश होऊन तोही बसला. मुलींसोबत हसत-खेळत, एकमेकांना घास भरवत जेवणं पार पडलीत.

मुलींची इच्छा नसताना सकाळच्या शाळेची आठवण करून देत देत त्यांना झोपवलं अन् स्वत:ही अंथरूणात पडला. त्याचा शांत झालेला स्वभाव पाहून तरी तिने हळू विचारलंच,

"काही झालंय का मुकूंद ?"

"नाही काही नाही." म्हणत त्यानं डोळे झाकले.

शाळेतल्या मित्रांनी ठरवलेल्या गेट टुगेदरच्या कार्यक्रमात खरं तर त्याला जायचंच नव्हतं. पण तिनेच आग्रह केला म्हणाली, "जा अश्या वेळीच जुन्या मित्रांची भेट होते. जुन्या आठवणी ताज्या होतात. तसंही मला सुट्टी आहे. मुलींचीही काही काळजी नाही. जा तू."

तिच्या आग्रहापुढे त्याचं काही चाललं नाही. इतक्या वर्षानंतर जेव्हा सर्व मित्र भेटले तेव्हा त्यालाही सुरवातीला आनंद झाला.

जुन्या आठवणी ताज्या झाल्या. वर्गातले किस्से नव्याने खुलले. पण जेव्हा प्रत्येकानं आपली कहाणी सांगायला सुरवात केली तसा हा शांतच झाला.

प्रत्येकजण आज कोणत्या ना कोणत्या पदावर कार्यरत होता. कोणी सरकारी नोकर होतं, कोणी प्रायव्हेट सेक्टरमध्ये उच्च पदावर होत, कोणी आयटीत चांगल्या पगारावर होत, तर कोणी यशस्वी व्यावसायिक होत.

वर्गातला तो-तो मित्र आता कुठे असतो, काय करतो ह्या सर्व गोष्टींची खोदून खोदून चौकशी झाली.

हा आपला शांतच होता. काय बोलणार होता तो तरी. बरेचसे मित्र आयुष्यात यशस्वी झालेले तर काही वयाच्या चाळीशीतही धडपडत होते. अन् त्या काहींत हा अग्रभागी होता. मित्रांसोबत जास्त काही मनातलं न बोलताच तो घरी परतलेला.

आयुष्यात अपयशीच राहिल्याची भावना त्यालाही सतत बाभळीच्या काट्यासारखी टोचत होती. तोच सल मनात घर करून बसलेला. मनातले विचार झटकत तो उठला अन् सरळ बाहेर जिन्यावर येऊन बसला. शांत.

त्याला असं बाहेर गेल्याचं बघून तिही गेली. अलगद त्याच्या शेजारी जाऊन बसली.

"असं बाहेर येऊन का बसलास ?"

"काही नाही असंच. का उठलीस ? उद्या जायचंय ना कामावर."

"ह्म्म ऽ जायचंय.. तुमचं गेट टुगेदर कसं झालं ?"

"झालं चांगलं."

"काही झालंय का असं शांत शांत का आहेस ?"

"कुठे काय. काहीच नाही."

"आज ओळखत नाही तुला मी मुकूंदा. सांग काय झालंय ते."

"काय सांगणार.. काय कळतच नाहीय.. आयुष्यात काय चालंलय ते.. जे करायचं होत ते जबाबदारीने केव्हाच मागे राहिलय."

"असं का बोलतोयस आणि कशाबद्दल.. तू खुश नाहियेस का माझ्यासोबत." ती डोळे बारीक करत सौम्य आवाजात म्हणाली.

"नाही तसं नाहीय. तुझ्या बाबतीत नाही बोलत मी. उलट तु आहेस म्हणूनच सर्व सुरूय. पण मी स्वत:ला कुठेतरी गमावून बसलोय. मला मी दिसतच नाहीय."

"आयुष्यात एका पाठोपाठ एक प्रसंग असे येत गेले अन् मी कुठच्या कुठे हरवलो काही कळतच नाही."

"काल जेव्हा मित्रांना भेटलो तेव्हा बरं वाटलं. पण क्षणभरासाठीच. प्रत्येकजण आज यशस्वी झालाय. कोणत्या ना कोणत्या पदावर काम करतोय. कुठेतरी व्यवसाय करतोय. काही तरी करून पैसे कमावतोय आणि मी.. मी काय करतोय.. मी कालही अपयशी होतो अन् आजही तसाच आहे." तो विषण्णपणेच बोलून गेला अन् शांतच झाला.

"तसं काही नाही मुकूंदा. तू चुकीचा विचार करतोयस. कोणी सांगितल तुला तु अपयशी आहेस म्हणून. मला सांग तुझ्यासारखे कितीजण आहेत जे आज घर सांभाळतात, घरातली कामं करतात, स्वयंपाक करतात, धुणीभांडी करतात, मुलांना सांभाळतात आणि मुख्य म्हणजे प्रामाणिक राहून निर्व्यसनी आयुष्य जगतात. फारच थोडी. मुकूंदा मी सुद्धा घरात इतकं काम करत नाही जितकं तू करतोस अन् ते ही एक पुरूष असून. तू पैसा कमावत नाहीस ह्याचा अर्थ तू अपयशी आहेस असं नाही."

"असतील तुझे मित्र भरमसाठ पैसा कमावणारे पण ते सर्वच निर्व्यसनी आहेत का.. प्रामाणिक आहेत का.. तुझ्यासारखं घरातलं एखादं काम तरी करतात का..?"

"संसार एकट्यानेच चालत नसतो ना मुकूंदा. दोघांची साथ लागते. आणि तुझी साथ आहे मला. उलट तु आहेस म्हणूनच मी नोकरी करू शकतेय. तु घरातली जबाबदारी घेतली नसतीस तर काय झालं असतं. मुलांना कसं वाढवलं असतं आपण.?"

"तु तुझं सर्व घरदार सोडून माझ्यासोबत मुंबईत आलास. मिळेल ते काम केलस. नोकरी करत असूनही घर सांभाळलस. आपल्याला मुलं झाल्यावर त्यांचा सांभाळ केलास. मुलांना पाळणाघरात ठेवायचं नाही म्हणून नोकरी सोडलीस. पुर्ण वेळ मुलांना दिलास. ही काही सोपी गोष्ट नाही मुकूंदा."

"असेल.. पण तरीही तुझी नोकरी होती म्हणूनच सर्व व्यवस्थित पार पडलं. खर्च पुरवता आला. मला तसं काहीच जमलं नाही. आज माझ्याकडे स्वत:च असं काहीच नाही."

"तु घरातली जबाबदारी उचलीस म्हणूनच मी नोकरी करू शकले ना.. आणि मी काय हे सर्व माझ्या एकटीसाठीच करतेय. हे सगळं आपलंच आहे ना.."

"तरी सुद्धा तुझा वाटा मोठा आहे. उद्या जेव्हा मुलं मोठी होतील. तेव्हा त्यांना समजेलच. आपण मोठं आपल्या आईमुळे झालोय. आईने कमवून घातलय. आपण ज्या घरात राहतोय ते सुद्धा आईनेच घेतलय. आपल्या शिक्षणाचा खर्च, खाण्या-पिण्याचा खर्च सर्व आईनेच केलाय.''

''आणि उद्या जेव्हा त्यांची लग्न होतील तो खर्च सुद्धा आपली आईच करणार आहे. बाप काही नाही. बापानी कधी काही केलंच नाही. मी जे करतोय ना ते आजही कोणाला दिसत नाही अन् उद्याही कोणाला दिसणार नाही.''

''लोकांना कमावणारे, नोकरी-व्यवसाय करणारेच बाप दिसत असतात. माझ्यासारखे बाप कायम अदृश्यच राहतात. ह्या अदृश्य वेदना कोणाला जाणवणारच नाहीत. अन् कोणी जाणून घेणारही नाही. माझं बापमन कधी कोणीच समजून घेणार नाही."

"मुळात आम्हा पुरूषांना कोणी लवकर समजूच शकत नाही. कितीही आनंदाचा क्षण असू दे किंवा दु:खाचा आम्ही शांतपणे ते पाहत असतो. आई मरू दे बाप मरू दे आम्ही शांतच असतो. मुलीचं लग्न असूदे किंवा मग मुलाचं यश असूदे आम्ही आमचे आनंदाश्रू डोळ्यातच ठेवतो. आमच्या भावना आम्ही आतल्या आतच ठेवतो.''

''आमचं सुख, आमचं दु:ख, आमच्या वेदना, आमचा त्रास, आमचं कर्तव्य, आमची जबाबदारी हे सर्व कायम अदृश्यच राहतं. ते कोणालाच दिसत नाही. अन् आम्हीसुद्धा ह्या गोष्टींचा कधी दिखावा करत नाही."

"नाही येत आम्हांला लवकर भावना व्यक्त करता. तुमचं बरं असतं तुम्ही मनमोकळेपणाने दुसऱ्यासमोर रडता. पण आम्हांला नाही येत तसं रडता. याचा अर्थ असा नसतो कि आम्ही भावनाशून्य आहोत.''

''पुरूष म्हणून एक जबाबदारी असते अंगावर. रडत बसून निभावता नाही येत ती. त्यासाठी खंबीरच राहावं लागतं. आमचे अश्रू एकाकीपणातच त्सुनामी होऊन वाहतात."

"अवघड असतं गं खूप पुरूष होण. बरेच त्याग करावे लागतात. जबाबदारी सांभाळावी लागते. घर सांभाळावं लागत. अन् इतकं सर्व करून पण आम्हांला शेवटी एकच ऐकावं लागतं "तुम्ही काय केलंत आमच्यासाठी."

"आज कळतंय मला. बाप होणं सोप्प नसतं. मी जेव्हा बाप होऊन ह्या सर्व गोष्टी बघतोय तर मला माझ्या बापाची आठवण येतेय. कसा सांभाळ केला असेल त्यानं आमचा. मला निदान तुझी साथ तर आहे. माझ्या बापाला कोणी केली असेल मदत. कसं वाढवलं असेल त्यानं आम्हांला.''

''माझं लग्न जुळवण्यासाठी काय काय केलं त्यानं. पण यश नाही आलं त्याला. माझंच नशिब चांगलं म्हणूनच की काय तु आलीस माझ्या आयुष्यात. एका क्षणाचीही पर्वा न करता माझा बाप मला काय बोलला माहितीय, "जा पोरा, मंबईत जाऊन संसार थाट. पोरगी चांगली हाय. तिला साथ दे. इथ आमी सांभाळून घेऊ. नको परवा करूस."

"माझ्या बापाला जसं मी समजून घेतलं तसं माझी मुलं घेतील का मला समजून. त्यांनी जर मला उद्या विचारलं, "बाबा काय केलंत तुम्ही आमच्यासाठी" तर काय सांगणार आहे मी त्यांना."

"नाही मिळाला वेळ जबाबदारीतून. तुम्हांला मोठं करता करता माझ्या इच्छा-आकांक्षा, माझी स्वप्न मारून टाकलीत मी."

"नाही मिळाला वेळ शिक्षणाला.. पैसे कमवायला.. छंद जोपासायला.. व्यवसाय करायला.. लहान असतानाच मोठा झालो."

"तरूणपणीच जबाबदार झालो. नाही होता आलं यशस्वी. वाटलं आज ना उद्या येईल आपल्या मनासारखं जगता. पण नाही. माणूस एकदा बाप झाला ना की त्याला त्याच्या मनासारखं नाही येत जगता. स्वत: आधी तो मुलांचा विचार करतो. त्यांच्या भविष्यासाठी चार पैसे राखून ठेवतो. स्वत: गरीबीत जगतो. फक्त मुलांसाठी. कुटूंबासाठी. कोण समजून घेईल ह्या गोष्टी. कुणाला कळेल हे बापमन."

"असं का बोलतोयस मुकूंदा. आपल्या मुली समजून घेतील तुला. मला सांग त्यांच्या जवळ जास्त वेळ कोण असतं मी का तू. अरे मी आई असून माझं कधी कधी ऐकत नाहीत पण तुझ्यासाठी वाट्टेल ते करतात. तू नसलास की वेड्या होतात पार."

"मी नसले तर माझी किती आठवण काढतात सांग बघू. तू दोन दिवस नव्हतास तर नुसतं बाबा बाबा करत होत्या. अजून लहान आहेत तर एवढं. मग बघ."

"लहान आहेत म्हणून त्यांना काही कळत नाही. उद्या कळू लागलं की त्या सुद्धा इतर मुलांसारखंच वागतील. मी काय केलं म्हणून विचारतील. तेव्हा मी काय सांगणार त्यांना. ह्या छोट्या छोट्या गोष्टींच काय मोल राहणार भविष्यात."

"ह्या छोट्या गोष्टी नाहीत मुकूंदा.. आपल्या मुलांचा सांभाळ करणं.. घर सांभाळण.. एक पुरूष असून बाईपेक्षा जास्त काम करणं.. आपल्या जोडीदाराशी

प्रामाणिक राहणं.. कोणत्याच प्रकारचं वाईट व्यसण नसणं.. आजच्या काळात ह्या छोट्या गोष्टी नाहीत."

"इतर लोकांची मुलं काय बोलतात मला माहित नाही पण आपल्या मुली तुझ्याबद्दल कधीच असं बोलणार नाहीत बघ तू. स्वत:ला असं अपयशी नको समजूस. माझ्या नजरेत तू एक यशस्वी पुरूष आहेस. पैशानेच माणसाची श्रीमंती मोजता येत नाही मुकूंदा.. चारित्र्यानेच त्याची खरी श्रीमंती कळते.''

''पैशाने यशस्वी असलेल्या माणसासोबत स्वत:ला तोलू नकोस. तुझी श्रीमंती तुझ्यात असलेल्या बापपणात आहे. तुझ्यातल्या खऱ्या माणूसपणात आहे. तुझ्या चारित्र्यात आहे."

"मला सांग मी कधी दुखावलंय का तुला.. माझ्यामुळे तर नाही ना.. तसं असेल तर मी सोडते माझी नोकरी.. सांभाळीण मी मुलींना.. पण तू असं नाराज होऊ नकोस."

"तुझी काहीच चूक नाही ह्यात. तु नको वाईट वाटून घेऊस. मी स्वत:च्या भविष्याबद्दलच चिंतेत आहे."

"नको करूस चिंता. अन् लोकांना काय वाटेल ह्याचा ही विचार करू नकोस. ते माझं घर सांभाळायला येत नाहीत."

तो काहीच बोलला नाही. शांतच राहिला. जसा याआधी राहिला होता तसा. मोठा भाऊ म्हणून, मुलगा म्हणून, नवरा म्हणून, अन् आता बाप म्हणून. ती त्याच्या खांद्यावर मान टाकून शून्यात पाहू लागली. तो भूतकाळातल्या वेदनेत हरवून गेला. अश्या वेदना ज्या फक्त तोच पाहू शकत होता. इतरांसाठी त्या अदृश्यच होत्या.

रात्र धिम्या गतीनं पहाटेच्या रूपात आली. नवा दिवस नव्या आव्हानांसह नवी स्पर्धा घेऊन उजाडला.

००

गरम गरम चपाती अन् भाजी करून दोन्ही पोरींचा डबा तिनं भरला. त्यांच्या दप्तरात खाऊ अन् फळं भरलीत. दोघींना घेऊन गेटवर जाऊन उभी राहिली. शाळेची बस मिळताच तिने नि:श्वास सोडला. पोरींना बाय-बाय करत ती घरात आली.

"काही करू मी मुकूंद ?" स्वयंपाकघरात जात तिने विचारलं.

"झालंय आता. जरा टेस्ट करून बघ एक." परातीतला एक गरम समोसा तिला देत तो म्हणाला.

"ह्म्म ऽ टेस्टी झालाय आता. कधी पर्यंत घेऊन जायची आहे ऑर्डर."

"दहा पर्यंत या म्हणालाय. पोचेन आरामात."

"मी पण येते."

"नको. मला उशीर होईल यायला. अजून एक दोन ऑर्डर कन्फर्म करायला जायचंय. तुझी इव्हिनिंग आहे ना. तु जेऊन आवरून जा. मी जाईन सावकाश." तो चेहऱ्यावर मंद स्मित ठेवत म्हणाला.

"चालेल." ती गालातच हसली अन् समोसे पॅकिंग करू लागली. दोन बॉक्स पॅक करून ते गाडीत ठेवायला तिने मदत केली.

"सावकाश जा. पोचलास की फोन कर आणि गाडी सावकाश चालव."

"हो." तो मंद स्मित करत म्हणाला अन् निघालाही.

ती शांत नजरेनेच जाणाऱ्या गाडीकडे पाहत राहिली. गाडीच्या मागच्या काचेवर लिहिलेलं "आराध्या केटरर्स" नजरेआड होईपर्यंत ती तशीच मंद स्मित करत उभी राहिली.

•••

(या कथा वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया 9136843413 या व्हॉटस्‌एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक

## प्रकाशित साहित्य




1. आरशातलं प्रेम

"ती दूर होती.. तिला पाहण्यासाठी मन आतूर होतं.. तिच्यासाठी मनात काहूर माजलं होतं.. पण मी मजबूर होतो.."

एका अव्यक्त प्रेमाची रहस्यमय कथा.

ॲमेझॉनवर तसेच बुकगंगावर उपलब्ध.

## 2. अधुरी कहाणी




"अपघाताने सुरु झालेली.. काळाने घडवलेली.. वास्तविकतेला भिडलेली एक कहाणी.."

ॲमेझॉन किंडलवर उपलब्ध.

## 3. अदृश्य बाप




"काळाच्या पलीकडे जाऊन कर्मचक्र समजाऊन सांगणारी, वडिल अन् मुलीची, बाप अन् मुलाची एक रहस्यमय भावनिक कथा."

ॲमेझॉन किंडलवर उपलब्ध.

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात.

पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता या जगात नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे.

माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे.

प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.